गुरुवार, २८ सप्टेंबर २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - ५७
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) THURSDAY 28 SEPT. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-03 • ISSUE-57 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5

# कांद्याला कोंब फुटले, सरकारला अजूनही जाग नाही!

## शेती प्रश्नांवर रान उठवणाऱ्या शेतकरी संघटनेत फूट; जनावरांना खायला घालावा लागतोय कांदा

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**वैजापूर : कांदा निर्यातीवरील ४० टक्के निर्यात शुल्क मागे घेण्यासाठी केंद्र सरकार आश्वासक पावले उचलेल, अशी आपेक्षा शेतकऱ्यांना होती. निर्यातदारांसह कांदा व्यापाऱ्यांनी कांद्याचे लिलाव बंद केले. त्यामुळे बाजार समित्या ओस पडल्या आहेत. शेतकऱ्यांना कांदा बाजारपेठेत आणता येत नसल्याने कांदा कोंडी झाली आहे. मंगळवारी व्यापारी संघटना, शेतकरी संघटनांशी चर्चा करून या प्रश्नावर तोडगा काढण्याचा प्रयत्न केला; परंतु ठोस तोडगा न निघाल्याने संप सुरूच आहे.**



कांदा व्यापारात स्पर्धा असायला हवी. बाजार समित्यांप्रमाणेच नाफेडही कांदा खरेदी करणार असेल, तर त्यातून अधिक भाव मिळेल. तेथे कांदा विक्रीचा पर्याय शेतकऱ्यांकडे उपलब्ध राहील, आशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. कांदा दरात सातत्याने घसरण होत आहे. आसपास कांद्याच्या मोठ्या बाजारपेठा असून इथला अधिकाधिक शेतकरी कांद्याची लागवड करतो. गेल्या अनेक वर्षांपासून कांद्याच्या भावात सातत्याने कमी अधिक फरकाने घसरण होत असताना शेतकरी मात्र अजूनही कांदा शेतीवर निर्भर आहे, असे असताना मात्र रात्रीचा दिवस करून पिकवलेल्या कांद्याला चाळीतच मोड फुटु लागले आहेत. त्यामुळेच कांदा कवडीमोल भावात विकला जात आहे. शेती प्रश्नांवर रान उठवणाऱ्या शेतकरी संघटनेत फूट आहे. मोड फुटलेले कांदे विकण्याचे मोठे आव्हान असणार आहे. तर दुसरीकडे मोठ्या आशेने ज्यांच्याकडे शेतकरी वर्ग पाहतो त्या पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देखील शेतकऱ्यांसाठी पुरेसे काम केले नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. आजही कांदा रस्त्यावर, उकिरड्यावर, जनावरांना खायला घालावा लागत आहे. कांदा उत्पादक शेतकरी वर्ग अपेक्षेने कांदा उत्पादन घेत असतो. मात्र आनेक वर्षांपासून जैसे थे परिस्थिती आहे. सध्या कांद्याला कोंब फुटले असून अजूनही सरकारला जाग आली नाही. मोदींनी मायबाप गरीब शेतकऱ्यांकडे लक्ष देणे गरजेचे आहे. आजही आमच्या, शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आहे. पण सरकारला अजून जाग येत नाही, मग शेतकऱ्यांनी जगायचे कसे हा मोठा प्रश्न आहे. त्यामुळे या माध्यमातून का होईना सरकारला जाग येईल, कांद्याविषयी योग्य धोरण राबविण्यात येईल, अशी आशा या शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. या शेतकऱ्यांनी वेगळा प्रयोग केला असून आपल्या देशाच्या पंतप्रधानांपर्यंत हा प्रयोग पोहोचेल आणि त्यांचे कांदाविषयी जे धोरण आहे, त्यात काहीसा बदल होऊन शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेतले जातील, हा आशावाद महत्वाचा आहे. यापूर्वी देखील तीन कृषी कायदे आणताना बाजारातला हस्तक्षेप कमीत कमी राहील, शेतकऱ्याच्या पिकाला भाव मिळेल, पण तसे काही झालेले नाही, कांदा कधी शेतकऱ्यांना रडवतो तर कधी ग्राहकांना; परंतु गेल्या काही वर्षांमध्ये तो सातत्याने शेतकऱ्यांनाच रडवत आहे. याला केंद्र सरकारची धोरणेही कारणीभूत आहेत. जगातील अनेक देशांमध्ये कांदा महाग झाला असताना भारतातील शेतकऱ्यांवर मात्र रडण्याची वेळ आली आहे.

# रानडुकराच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

## आ. मेघना बोर्डीकर यांच्या वाहनातून जखमीला रुग्णालयात केले दाखल

आधुनिक केसरी न्यूज



**चारठाणा :** रानडुकराच्या धडकेत एक दुचाकीस्वार जखमी झाल्याची घटना जिंतूर जालना महामार्गावरील अकोली पाटीजवळ दि.२७ बुधवार रोजी सकाळी १० च्या सुमारास घडली. जिंतूर तालुक्यातील अकोली येथील बालासाहेब सडाळ वय ५५ वर्षे हे जालना रोड वरून येत होते. अकोली पाटीजवळ आले असता, समोरून एक रानडुक्कर त्यांच्या गाडीला अचानक आडवे आल्याने दुचाकीस्वार रस्त्याच्या कडेला पडले. दरम्यान जिंतूर कडून जोगवाडा येथे कार्यक्रमासाठी आमदार मेघना बोर्डीकर या आपल्या चारचाकी वाहनाने जात होत्या. यावेळी आमदार मेघना बोर्डीकर व भाजपा तालुका अध्यक्ष ऑड. विनोद राठोड त्यांच्या सहकाऱ्यांनी अकोली ग्रामस्थांच्या मदतीने जखमीला आपल्या चारचाकी वाहनातून जिंतूर येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. जखमीवर जिंतूर ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहे.

# मणिपूरमधील परिस्थिती 'जैसे थे'

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** मे महिन्यापासून मणिपूर राज्यात हिंसा सुरू आहे. दोन जातीय समुदाय एकमेकांसमोर उभे ठाकल्याने राज्य अशांत झाले आहे. दरम्यान, दिवसेंदिवस येथील परिस्थिती चिघळत गेल्याने मणिपूर राज्य अशांत क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे. इंडिया टुडेने यासंदर्भातील वृत्त दिले आहे. राज्य सरकारच्या अधिसूचनेनुसार, १९ विशिष्ट पोलीस ठाणे क्षेत्र वगळता संपूर्ण राज्य सशस्त्र दल विशेष अधिकार कायदा अंतर्गत शांतता क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे. विविध अतिरेकी गटांच्या हिंसक कारवायांवर लक्ष ठेवण्याकरता संपूर्ण मणिपूर राज्यात नागरी प्रशासनाच्या मदतीसाठी सशस्त्र दलांचा वापर करण्याची परवानगी देण्यात आली आहे. राज्यातील एकूणच कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती आणि राज्य यंत्रणेची क्षमता लक्षात घेता, राज्य सरकारने सध्याच्या अशांत क्षेत्राच्या स्थितीवर लक्ष ठेवण्याचा निर्णय घेतला आहे, असे राज्य सरकारने जाहीर केलेल्या परिपत्रकात म्हटले आहे. मे महिन्यापासून मणिपूरमध्ये मैतेई आणि कुकी समुदाय एकमेकांसमोर आले आहेत. आरक्षणाच्या मुद्द्यावरून मणिपर राज्यात हिंसाचार सुरू आहे. महिलेची नग्न धिंड, गोळीबार, जाळपोळ आदी घटनांमुळे मणिपूर अशांत झाले आहे. त्यामुळे संभाव्य परिस्थिती टाळण्यासाठी सरकारने पुढील सहा महिन्यांसाठी राज्यात निर्बंध लागू केले आहेत. १ ऑक्टोबरपासून हे निर्बंध लागू होणार आहेत. तसेच, इंटरनेट सेवाही खंडित केली आहे. इम्फाळ, लॅम्फेल, सिटी, सिंगजामेई, सेकमाई, लामसांग, पटसोई, वांगोई, पोरोम्पॅट, हेनगांग, लमलाई, इरिलबुंग, लीमाखोंग, थौबल, बिष्णुपूर, नंबोल, मोइरांग, काकचिंग आणि जिरीबाम हे पोलीस ठाणे मात्र अशांत क्षेत्रातून वगळण्यात आले आहे.


# आज बाप्पाला निरोप, गुलाल टाळा; फुले, पाकळ्या उधळा!

## पोलिस प्रशासनाचे आवाहन : यावर्षीचा गणेशोत्सव डीजेमुक्त आणि गुलालमुक्त करा

आधुनिक केसरी न्यूज

एकनाथ अवचार


चारठाणा : लाडक्या बाप्पाचे स्वागत आणि निरोप देताना गुलालाची उधळण केली जाते. याच गुलालात कचखडी, बारीक कण, केमिकल असतात. ते कान, डोळे नाक, तोंडात गेल्यावर घातक ठरू शकते. शिवाय याच गुलालामुळे दोन समाजात तेढही निर्माण होऊ शकतात. हे सर्व टाळण्यासाठी गणेशभक्तांनी गुलालाऐवजी फुले किंवा फुलांच्या पाकळ्या गणेशमूर्तीला व्हाव्यात व उधळण करण्यात यावे, असे आवाहन येथील पोलिसांनी केले आहे. गणेशोत्सव आणि आगामी नवरात्रोत्सवाच्या अनुषंगाने आचारसंहिता जाहीर केली असून, त्याचे पुस्तक नागरिकांना देण्यात आले आहे. लाडक्या गणरायाचे दि.१९ मंगळवारी आगमन झाले व विसर्जन दि.२८व २९या दोन दिवसात वेळेवर करण्यात येणार असून यावर्षी दुष्काळजन्य परिस्थिती आहे. असे असतानाही गणेशभक्तांनी आपल्या लाडक्या बाप्पाचे आनंदात आणि जल्लोष करत स्वागत केले. यावेळी अनेक मंडळांनी गुलालाची उधळण केल्याचे दिसले. तसेच काही ठिकाणी गुलाल अंगावर पडल्याने व इतर कारणांनी किरकोळ बाचाबाचीही होऊ शकते. परंतु आता विसर्जन मिरवणुकीत असे प्रकार घडू नयेत, यासाठी पोलिसांनी गणेश मंडळ आणि भक्तांना आवाहन केले आहे. यावर्षीचा गणेशोत्सव डीजेमुक्त आणि गुलालमुक्त करावा. डीजेऐवजी पारंपरिक वाद्य आणि गुलालाऐवजी फुलांची उधळण करावी, असे आवाहन येथील पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बालाजी गायकवाड यांनी केले आहे.



शांतता ठेवून चारठाणा व परिसरातील सर्व बिटातील सर्व गणेश मंडळातील आतापर्यंत आदर्श घालून दिला आहे. सर्व सण, उत्सव मिळून साजरा केले जातात. यापुढेही नागरिकांनी असेच आनंदी राहून पोलिसांना सहकार्य करावे. शांततेत साजरा होणाऱ्या उत्सवाला विरोध नाही; पण कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर आम्ही कारवाई करणार. गणेशोत्सव, नवरात्रोत्सवाच्या अनुषंगाने आचारसंहिता जाहीर केली आहे. सर्व गणेशभक्तांनी यावर्षीचा गणेशोत्सव डीजेमुक्त साजरा करावा. तसेच शक्य झाले तर गुलालाऐवजी फुले किंवा फुलांच्या पाकळ्यांची उधळण करावी.
**–सहाय्यक पोलिस निरीक्षक बालाजी गायकवाड**

**चारठाणा पोलीस कर्मचाऱ्यांचे पथसंचलन :** अगामी गणेश विसर्जन व ईद-ए- मिलादच्या पार्श्वभूमीवर शातंता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी येथील पोलीस ठाण्याच्या अंतर्गत येथील परिसरातील मुख्य रस्त्यावरून आज दुपारी १२वा. पोलीसाचा रुटमार्च काढण्यात आला आहे या पोलीस रुटमार्च मध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक बालाजी गायकवाड व सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक विनोद साने, बीट जमदार सुधाकर कुटे, पो .कॉ .पवन राऊत, जिलानी शेख, कोडरे, सिध्दार्थ आचार्य, यांच्यासह सर्व पोलीस कर्मचाऱ्यांसह होमगार्ड या कार्यक्रमास उपस्थित होते.








विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

# जरा थांबा

बऱ्याच दिवसांनी एक सुंदर पुस्तक हाती लागले. हे पुस्तक आहे अलका काकडे यांचं. पुस्तकाचं नाव आहे 'जरा थांबा, विचार करा !' हे पुस्तक उन्मेष प्रकाशनाने प्रकाशित केले आहे. साधारणपणे १७० पानी असणारे हे पुस्तक दोन दिवसात देखील वाचून पूर्ण होऊ शकते. पण त्यातील आशय मात्र विचार करायला लावणारा आहे. त्यामुळे नुसतेच वाचून सोडून देण्यासारखे हे पुस्तक नाही. त्यातील अनेक लेख आपल्याला आपल्या स्वतःशीच संबंधित आहेत असे वाटतात. त्यामुळे हे लेख पुन्हा पुन्हा वाचून विचार करण्यासारखे आहेत. पुस्तकाची भाषा ओघवती आणि वाचकांशी संवाद साधणारी आहे. त्यामुळे हे पुस्तक वाचताना कुठेही कंटाळवाणे होत नाही. मानसशास्त्राच्या अभ्यासक असणाऱ्या आणि अनेक वर्षांपासून समुपदेशन करणाऱ्या अलकाताई यांनी हे पुस्तक कुठेही कंटाळवाणे, क्लिष्ट, निरस होणार नाही याची काळजी घेतली आहे. सुरुवातीला या पुस्तकातील लेख दै. संचार मधील 'विचारयात्रा ' या सदरात प्रसिद्ध झाले. नंतर ते लेख आपल्यासमोर पुस्तकरूपाने आले आहेत. अगदी मुखपृष्ठापासूनच हे पुस्तक आपले लक्ष वेधून घेते. मुखपृष्ठावरील चित्र पुस्तकाचे अंतरंग स्पष्ट करणारे आहे. एका सीमारेषेवर असणारी एक व्यक्ती पुढे पाऊल टाकताना आपल्याला दिसते. आपण जेव्हा एखाद्या गोष्टीसाठी आपले पाऊल पुढे टाकतो, तेव्हा ते विचारपूर्वकच टाकायला हवे. त्यासाठीच ;' जरा थांबा, विचार करा ! ' असे लेखिका आपल्याला सांगते. हातात घेतल्यापासूनच हे पुस्तक मनाची पकड घेतं. दैनंदिन जीवनातील आपल्याला परिचित असणारी उदाहरणे किंवा घटनांचे संदर्भ देऊन लेखिका वाचकांशी सहज संवाद साधते. एखादा विषय कसा खुलवत, फुलवत न्यावा याचं उत्तम भान लेखिकेकडे आहे. रोजच्या जीवनातील छोट्या छोट्या समस्यांनी खचून जाणाऱ्या, निराश होणाऱ्या व्यक्तींसाठी हे पुस्तक अतिशय मोलाची भूमिका बजावतं. असं असलं तरी सर्वांनीच एकदा जरूर वाचावे असे हे पुस्तक आहे. या पुस्तकातील पहिला लेख 'जरा थांबा, विचार करा ' याच शीर्षकाचा आहे. हा लेख वाचताना, 'अरेच्चा, असं आहे तर ! आपण कधी असा विचारच केला नाही ' असे वाचकाला वाटते. दुसरा लेख ' सुगंध दरवळू द्या ' या नावाचा आहे. नावाप्रमाणेच या लेखातील शब्दाशब्दातून मन प्रसन्न करणारा शब्दसुगंध दरवळतो आहे. जीवनातील एखादी छोटीशी गोष्ट किती महत्वाची असते ते यात सहजपणे पटवून दिले आहे.



# आनंदी पहाट

## कौटुंबिक विभाजनाचे परिणाम घातकच

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

कौटुंबिक विघटनानंतर व्यक्ती विघटन होऊ लागले आहे. गरजांची वाढ, अंधानुकरण, बदलत चाललेली जीवनशैली, वाढलेल्या व्यक्तिगत अपेक्षा आणि वाढती महागाई अशा अनेक कारणांमुळे विवाहाच्या पश्चात अर्थाचा स्वार्थ अधिक प्रमाणांत दिसत आहे. कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती कमावती झाल्यामुळे ज्याला त्याला स्वकमाईचे महत्व अधिक वाटू लागले असल्याचे दिसते. मी, माझे आणि माझ्यापुरते ही भावना त्यामुळे रुजायला लागल्याचे स्पष्ट होते. विवाहानंतर विवादाची सुरुवात अनेकदा ह्या अर्थाच्या स्वार्थामुळेच होत असल्याचे पाहायला मिळते. कौटुंबिक उत्पन्नापेक्षा व्यक्तिगत उत्पन्न अधिक महत्वाचे समजले जाऊ लागले कि परस्परांच्या जाणीवा न जपण्याचीच उणिव निर्माण होत असल्याचे काही ठिकाणी दिसून येते. विवाहानंतर उभयतांनी आपापल्या गरजांची पूर्तता देखील स्वकमाई मधून करायला सुरुवात झाली कि, एकमेकांच्या उणिवांना दोष म्हणून पाहायला सुरुवात होऊ लागते. विवाहित व्यक्ती एकमेकांपासून कायमस्वरूपी विभक्त होण्याकडे वळत आहेत. काही जण तर एका वर्षाच्या आतच वेगळे व्हायचा निर्णय घेऊ इच्छितात. काही जणांमध्ये अनेक वर्षांच्या सहजीवनानंतर घटस्फोटाचे विचार मनांत यायला लागतात. अर्थात प्रत्येकाची कारणे निरनिराळी असतीलही पण एक-दोन अपत्य असलेल्या व्यक्ती देखील असा विचार जेव्हा करतात तेव्हा त्या दोघांनाही त्यांचीच अपत्य आपत्ती वाटायला लागतात. त्यांच्या विभक्तीमुळे होणाऱ्या परिणामांची जाणीव न होणे हीच उणिव म्हणावी लागेल. एकमेकांच्या प्रामाणिकपणाविषयी संशय येत असेल, तर ते नाते फार काळ चांगले टिकत नाही. एखादी व्यक्तिगत मागणी पूर्ण झाली नसेल तर नाराज होण्यापेक्षा त्यामागचे कारण समजून घ्यावे, दुसऱ्याची बाजू देखील लक्षांत घेणे आवश्यक असते. काहीवेळा गैरसमजांमुळे अविश्वास निर्माण होत राहतो आणि जोडीदार आपली फसवणूक करतोय असे हळूहळू वाटायला लागते, ते अधिक घातक असते.



आधुनिक केसरी

### नाम तुझे घेता | पांडुरंगा ||

श्रध्देला ह्या यावा | भक्तीचा सुगंध ||
वारीचा आनंद | सत्कर्मात ||१||
सोन्याचा पिंपळ | फुलावा अंतरी ||
भाव निरंतरी | सात्विकाचा ||२||
नांदावा जीवाचा | विठ्ठल समिप ||
माऊलींचा दीप | तेजळावा ||३||
भूकेल्याची माय | गाथा ज्ञानेश्वरी ||
जन्माची शिदोरी | लाभो मज ||४||
तृप्तीची ढेकर | अमृते सेविता ||
नाम तुझे घेता | पांडुरंगा ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरुपण

आधुनिक केसरी

सम्पत्तौ च विपत्तौ च मत्समीपे हि तिष्ठसि |
अनुभूतिर्ममैषास्ति दुर्गां देवीं नमाम्यहम्
|| ९७ || संपत्ती आणि विपत्ती या दोन्ही स्थितीत तू माझ्या जवळ राहतेस. अशी माझी अनुभूती आहे. मी दुर्गा देवीला नमस्कार करतो.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

परम पुरुष का दूत हैं, ज्योतिय विश्व प्रकाश । द्योतक गुरु अध्यात्म का, मधुमति आव प्रभाश ।।७० ।। (स्वर्वेद पंचम मण्डल दशम अध्याय) ०५/१०/७० मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : ते सद्गुरू परम पुरुषाचे दूत आहेत आणि समस्त विश्वाचे प्रकाशमान ज्योती आहेत तसेच अध्यात्म ज्ञानाचे प्रकाशक सद्गुरू आहेत, ज्यांच्या द्वारे या विश्वाला ब्रह्मविद्येचा प्रकाश प्राप्त होतो.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# शुन्यत्वनिरसन

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

प्रपंचात काय आणि परमार्थात काय मतमतांतरे ही असतातच,या मतांच्या विरोधाभास आणि स्विकार करत अनेक पिढ्या गेल्या व अजूनही लाखो,करोडो लोकांच्या प्रतिक्रिया देत घेत संसार चाललेला आहे.संसारात किंवा या विश्वाच्या उत्पत्तीचे वर्णन करताना अनेक संन्यासी लोकानी आपल्याला संसार सुखाच्या काही गोष्टी सांगितल्या आहे.सत्पुरूषाच्या संगतीत राहून स्वतः चा व समाजाचा उध्दार करावा हे या निमित्ताने सांगितले आहे. आता आपण श्रीमत दासबोधाचे वाचन करणार आहोत. माणुस, काय, फळफुल काय कोणीही एकसारखे दिसायला व वागायला नसते. एक सारखे कुणीच असु नये हा तर प्रपंचाचा नियम आहे. जरा डोळस पणाने विचार करा मित्रांनो या धरतीवर प्रपंचाचा पसारा एवढा मोठ्ठा आहे की एका सारखचं दुसरा दिसत नाही.

# प्रपंचात परस्परांशी प्रेमभाव कसा वाढेल

आधुनिक केसरी



निसर्गतःच प्रेम हे प्रत्येक व्यक्तीत आणि प्राणिमात्रांत असते. फार काय, प्रेमाशिवाय मनुष्यप्राणी जिवंत राहू शकणार नाही. प्रेमाने सर्व जग वश करून घेता येते. प्रेम ठेवण्यात पैसा खर्च होत नाही, कष्ट होत नाहीत. परंतु प्रत्येकाचा अनुभव पाहावा तर प्रेम करणे तितकेसे सोपे आहे असे दिसत नाही. याचे कारण प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव निराळा, आवड निराळी, आणि दैवयोगाने आलेले ऋणानुबंध निरनिराळे असतात. आपल्या विचाराचे लोक असतील त्यांच्यावर स्वाभाविकच प्रेमच जडते; विरूद्ध असतील त्यांच्याबद्दल प्रेम वाटत नाही, किंबहुना द्वेषही उत्पन्न होतो. द्वेष उत्पन्न का होतो तर आपला आणि दुसऱ्याचा विचार आणि आवड जमत नाही म्हणून. परंतु थोडा विचार केला तर असे दिसते की, आपण ज्या कारणामुळे दुसऱ्याचा द्वेष करतो, तेच कारण दुसऱ्याने आपला द्वेष करायला पुरेसे होते. उदाहरणार्थ, एखादी गोष्ट आपल्याला न आवडली आणि तीच दुसऱ्याला आवडली, तर मला न आवडलेली गोष्ट दुसऱ्याला आवडल्यामुळे दुसऱ्याचा द्वेष करायला मला तेवढे कारण पुरेसे होते. मग त्याच न्यायाने, त्याला न आवडलेली गोष्ट मला आवडते हेच कारण त्याने माझा द्वेष करायला पुरेसे नाही का ? 'व्यक्ती तितक्या प्रकृती' अशी म्हण आहे. त्याचा अर्थच असा की, स्वभावाप्रमाणे प्रत्येकाची आवड ही निराळी असणारच. म्हणून द्वेषबुद्धी नाहीशी करण्याकरिता प्रत्येकाच्या स्वभावाला थोडी सवलत ठेवणे जरूर आहे; आणि प्रेम जडण्याकरिता, सर्वांना आवडणारी जी गोष्ट असेल तिकडे लक्ष देणे जरूर आहे.

प्रेम करण्याचा धडा गिरवताना सुरूवात आपल्या घरापासून करावी; घरातली माणसे, नंतर शेजारी, आणि त्यानंतर आजूबाजूला, आपलेपणाची भावना आपल्या कृतीने वाढवावी; म्हणजे क्रमाक्रमाने प्रेमाची वाढ होऊन सर्व वातावरण प्रेममय होऊन जाईल. सर्वांशी निष्कपट प्रेमाने वागावे; आपल्या बोलण्यामध्ये, नव्हे, पाहण्यामध्येसुद्धा प्रेम असावे. आपले बोलणे अगदी गोड असावे. आपल्या अंगी सहजता यावी. घरामध्ये 'अमुक एक गोष्ट कराच' किंवा 'नकाच करू' असे हट्टाने न म्हणता आपण राहावे. जसे घडेल तसे घडू द्यावे. देह असा प्रारब्धावर टाकणे मला फार आवडते.

प्रेम करायला गरिबी आड येत नाही, किंवा श्रीमंती असेल तर फार द्यावे लागत नाही. जसे आई आणि मुलाचे प्रेम असते तसे भगवंताचे प्रेम लागावे. ज्याला भगवंताचे प्रेम येईल, तो सृष्टीकडे कौतुकाने पाहील. भगवंताचे प्रेम हे कोणत्याही साधनाचा प्राण आहे; ते मागण्यासाठी रोज भगवंताची प्रार्थना करावी, आणि त्याच्या अनुसंधानात राहण्याचा प्रयत्न ठेवावा.

# साईबाबा

हे तीन रिपोर्ट जानेवारी सन १९११, जुलै सन १९१२ तसेच ऑगस्ट सन १९१२ मध्ये लिहले गेले होते.[९] याहून आधी अहमदनगर कलेक्टरेटच्या कोपरगाव सेकंड सेटलमेंट सर्व्हे मध्ये श्री साई अवलिया फकिरांच्या सन्मानार्थ सुरू झालेल्या उरुसाची पार्श्वभूमी आणि त्याचे महत्व अधोरेखित होते. हा सर्व्हे सन १९०७ साली पूर्ण झाला होता.[१०] तसेच बाबांच्या महासमाधीनंतर २४/१०/१९१८ रोजी कलेक्टर सी.ए.बेट्स यांनी हरी सीताराम दीक्षित यांच्या पत्रावर उत्तर देताना दिलेल्या ऑर्डर मध्ये श्री साईबाबांचा मोहम्मदन ऑफ अननॉन ओरिजिन असा उल्लेख करून बाबांचे मूळ अज्ञात असल्याचे स्पष्ट केले आहे. यावरून तत्कालीन ब्रिटिश गुप्तहेर आणि अधिकाऱ्यांनाही श्री साईबाबांचे मूळ शोधता आले नाही. या तत्कालीन आणि सरकारने केलेल्या दस्तऐवजातून मिळालेल्या नोंदी श्री साईबाबांबद्दल महत्वपूर्ण आणि खात्रीलायक माहिती देतात.



आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
गुरुवार, २८ सप्टेंबर २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari





महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या छत्रपती संभाजीनगरातील विभागीय कार्यालयात श्री गणेशाच्या महाआरती प्रसंगी प्रभंजन महातोले. दुसऱ्या छायाचित्रात आरती करताना निमाई हॉस्पिटलचे डॉ. संतोष मद्रेवार, सोबत डॉ. प्रभू गोरे, जिल्हा संघटक विलास शिंगी, ज्येष्ठ पत्रकार सुधीर कोर्टीकर, कार्यालय प्रमुख संजय व्यापारी, प्रसिद्धी प्रमुख मनोज पाटणी, सहसचिव संदीप घंटे, अतुल खंडगावकर आदी.

# भारतीय संस्कृती व्यक्ती, समाज, राष्ट्राला पुढे घेऊन जाणारी : प्रभंजन महातोले

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** संस्कृती आणि धर्म यामध्ये खूप अंतर आहे. धर्म व्यक्तिगत असतो. संस्कृती धर्मापासून प्रेरणा घेते आणि त्यावर प्रभावही पाडते. धर्म हे सरोवराप्रमाणे असते. तर संस्कृती त्यातील कमळाच्या फुलाप्रमाणे असते, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. भारतीय संस्कृती व्यक्ती, समाज आणि राष्ट्राला पुढे घेऊन जाणारी एक विचारधारा आहे. भारतीय संस्कृती जागतिक पातळीवर सर्वाधिक प्राचीन आहे. युनान, रोम, रशिया आणि चिनी संस्कृतीपेक्षाही भारतीय संस्कृती प्राचीन असल्याचे सांगितले जाते. जागतिक स्तरावरील अनेक विद्वान भारतीय संस्कृतीला प्राचीन मानतात, असे प्रतिपादन मॅक्सफ्लो पॅम्पस अँड कंट्रोल मॅनेजिंग डायरेक्टर प्रभंजन महातोले यांनी केले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या छत्रपती संभाजीनगरातील विभागीय कार्यालयात श्री गणेशाच्या महाआरती प्रसंगी प्रभंजन महातोले बोलत होते. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या संकल्पनेतून दरवर्षीप्रमाणे यंदाही छत्रपती संभाजीनगरातील विभागीय कार्यालयात श्री गणेशाची स्थापना करण्यात आली. पुढे बोलताना महातोले म्हणाले की, 'आत्मवत सर्वभूतेषु'चा भाव भारतीय संस्कृतीच्या जीवन मूल्यांचा अविभाज्य भाग आहे. यामुळेच भारतीय संस्कृतीच्या प्रार्थनेमध्ये विश्वाचे कल्याण, विश्वशांती आणि विश्व समन्वयाचा समावेश आहे. परमार्थ आणि सर्वांचे कल्याण भारतीय संस्कृतीचे मूळ आहे. भारतीय संस्कृतीत लोक कल्याण आणि लोकहित या भावना सर्वश्रेष्ठ आहेत. दुसऱ्यांच्या कल्याणात आणि आनंदात स्वतःचे सुख मानणे, ही भारतीय संस्कृती आहे. अशी भावना समाजात निर्माण होत नाही, तोपर्यंत सामाजिक समरसता निर्माण होणार नाही. सायंकाळीची आरती निमाई हॉस्पिटलचे संचालक डॉ. संतोष मद्रेवार यांच्या हस्ते करण्यात आली. त्यावेळी ते बोलताना म्हणाले, आज ग्रामीण भागामध्ये हॉस्पिटलच्या सेवा सुविधा गरिबांपर्यंत पोहोचवणे माझे स्वप्न आहे. आज ग्रामीण भागात जन्मास येणाऱ्या बाळाचा मृत्यूदर खूप आहे. तो शून्यावर कसा आणता येईल, यासाठीच मी सतत प्रयत्नशील आहे. निमाई हॉस्पिटलच्या माध्यमातून आम्ही महाराष्ट्राबाहेर मदर अँड चाईल्ड केअर हॉस्पिटलची मोठी एक मोठी चेन उभी करीत आहोत. यावेळी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रभू गोरे, जिल्हा संघटक विलास शिंगी, जिल्हा उपाध्यक्ष छबुराव ताके, प्रसिद्धी प्रमुख मनोज पाटणी, ज्येष्ठ पत्रकार सुधीर कोर्टीकर, कार्यालय प्रमुख संजय व्यापारी, सहसचिव संदीप घंटे, अतुल खंडगावकर, छायाचित्रकार सचिन उबाळे आदींसह पत्रकारांची उपस्थिती होती.

# मंत्रालयात दलालांचा मुक्त वावर : पटोले

## शासन जनतेच्या दारी जाते तर मग जनता शासनाच्या दारी का येते?

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातील शिंदे सरकारला केंद्रातील भाजपा सरकारच्या हुकूमशाही कारभाराची लागण झालेली आहे. केंद्र सरकार मुठभर लोकांसाठी काम करते तसेच राज्य सरकारही काम करत आहे. सरकार सामान्य जनतेची कामे करण्यासाठी आहे, मुठभर लोकांसाठी नाही. आपले काम स्थानिक पातळीवर होत नाही म्हणूनच लोक मंत्रालयात येत असतात. मंत्रालयात दलालांना मुक्त वावर आहे आणि सुरक्षेचे कारण पुढे करून सर्वसामान्य जनतेला मात्र मंत्रालयात प्रवेश नाकारला जात आहे, असा घणाघाती आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे.
यासंदर्भात बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, गुजरातमध्ये एक हुकूमशाही व्यवस्था सुरु झाली तीच व्यवस्था २०१४ पासून केंद्रात आली आणि आता हीच हुकूमशाही व्यवस्था महाराष्ट्रात आली आहे. मंत्रालयात दररोज हजारो लोक आपल्या कामांसाठी येतात, स्थानिक प्रशासनाकडे हेलपाटे घालूनही त्यांचे काम होत नाही. मंत्री फक्त आश्वासने देऊन मोकळे होतात पण त्याची कार्यवाही होत नाही म्हणून शेवटी लोक मंत्रालयात येतात, काहीजण आत्महत्या करण्याचा प्रयत्नही करतात. कोणीही आत्महत्या करु नये हीच आमची भूमिका आहे पण लोक जीव देण्यापर्यंत का जातात? याचा सरकारने विचार करायला हवा. शासन आपल्या दारी म्हणत कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी व केवळ जाहीरातबाजी केली जात आहे प्रत्यक्षात या कार्यक्रमातून काही साध्य होत नाही म्हणून तर लोक मंत्रालयात येतात. काम होत नाही म्हणूनच आत्महत्या करण्यापर्यंत टोकाचे पाऊल उचलतात, सर्वसामान्य जनतेला मंत्रालयात प्रवेश मर्यादित करणे त्यासाठी जाचक अटी घालणे ही हुकूमशाहीप्रवृत्ती आहे. हे जाचक नियम लागू न करता सर्वसामान्यांना मंत्रालयातील प्रवेश सुलभ करण्यावर सरकारने भर द्यावा. मंत्रालयात प्रवेश करण्यासाठी मोठ्या रांगा लागतात, त्यांच्यासाठी कोणत्याही सोयी नाहीत, जनता ही राजा आहे, त्यांचा सन्मान झाला पाहिजे.
आजच्या मंत्रालयाला पूर्वी सचिवालय नाव होते, माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनी त्याचे नाव बदलून मंत्रालय असे केले, त्यामागे सर्वसामान्य जनतेला या वास्तूशी जोडण्याचा त्यांचा उदात्त हेतू होता. सरकार जनतेसाठी आहे, मंत्री महोदयांनी ते प्रशासनाच्या मदतीने चालवणे अपेक्षित आहे. असे असताना केवळ सुरक्षेचे कारण पुढे करुन व गर्दी कमी करायची यासाठी प्रवेशापासून वंचित ठेवण्याचा प्रकार संताप आणणारा आहे, असेही नाना पटोले म्हणाले.

**सरकारचा दलाल कंत्राट वाटप करतो :** राज्यातील येड्याच्या सरकारने एका व्यक्तीला तिजोरीच्या चाव्या दिल्या असून हा सरकारचा दलाल निर्मल बिल्डिंगमध्ये बसून भरमसाठ किमतीला कंत्राटाचे वापट करतो. जनतेच्या घामाचा पैसा कंत्राटदारांना देऊन उधळपट्टी सुरु आहे. अशा दलालांना मंत्रालयात मुक्त वावर आहे आणि सर्वसामान्य जनतेला निर्बंध लावले जात आहेत. सरकारच्या या दलालाचा भांडाफोड काँग्रेस पक्ष लवकरच करणार आहे.

**भारतमातेपेक्षा नरेंद्र मोदी मोठे आहेत का? :** भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रप्रेम, हिंदुत्व, हे बेगडी आहे. भाजपा कोणाचाच नाही तो फक्त सत्तेचे भुकेला आहे, सत्तेसाठी ते काहीही करु शकतात. भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अहमदनगर शहरातील दौऱ्यात भारत मातेच्या घोषणा दिली जात असताना या घोषणा थांबवून बावनकुळे यांनी नरेंद्र मोदींच्या घोषणा द्यायला लावल्या. भाजपला भारतमाता, प्रभू श्रीरामांपेक्षा पंतप्रधान नरेंद्र मोदी मोठे वाटतात, अशी टीका नाना पटोले यांनी केली आहे. कांद्याप्रश्नी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना नाना पटोले म्हणाले की, भाजपाचे सरकार हे शेतकरी विरोधी आहे. कांद्याला बाजारात चांगला भाव मिळत असताना त्याचा निर्यात कर ४०% वाढवून भाव पाडले व शेतकऱ्याला मिळणारे पैसे हिरावून घेतले. टोमॅटोला चांगला भाव मिळत होता पण पुन्हा बाजारात भाव पाडले. शेतकऱ्याचा माल बाजारात येताच भाव पाडून शेतकऱ्याचे पैसे मिळणार नाहीत याची व्यवस्था केली जाते. एकीकडे शेतमालाला भाव मिळत नाही तर दुसरीकडे शेती साहित्यावर जीएसटी लावला जातो, खते, बियाणे, डिझेलचे दर वाढवले जात आहेत. भाजपा सरकारला शेतकऱ्यांचे काहीही देणेघेणे नाही, असेही नाना पटोले म्हणाले.

# ईद-ए-मिलादनिमित्त शुक्रवारी सार्वजनिक सुटी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** अनंत चतुर्दशीनिमित्त गणेश विसर्जन आणि ईद ए मिलादचा सण उद्या गुरुवारी (२८ सप्टेंबर) रोजी साजरा होणार आहे. यामुळे गर्दी आणि मिरवणुकांचे योग्य



व्यवस्थापन करण्याचा पोलीस प्रशासनावर ताण येणार आहे. यामुळे महाराष्ट्र सरकारने शुक्रवार २९ तारखेस शासकीय सुट्टी जाहीर करण्याचा निर्णय घेतला आहे. ऑल इंडिया खिलाफत कमिटीच्या शिष्टमंडळाने यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन विनंती केली होती. राज्यात शांततेचे वातावरण असावे. तसेच पोलिसांना गर्दी तसेच मिरवणुकांचे नियोजन करता यावं. यासाठी २९ तारखेस सुट्टी देण्याची विनंती या संघटनेनं केली होती. या शिष्टमंडळात खासदार राहुल शेवाळे, आमदार अबू आझमी, आमदार रईस खान, नसीम खान, आदींचा समावेश होता.
अनंत चतुर्दशीनिमित्त राज्याच्या विविध भागात गणेश विसर्जन मिरवणुका आणि ईद ए मिलादनिमित्त मिरवणुका काढण्यात येत असतात. दोन्ही सणांमुळे एकाच दिवशी निघणाऱ्या मिरवणुकांमुळे पोलीस यंत्रणांवर ताण येण्याची शक्यता लक्षात घेऊन २९ सप्टेंबरची सुट्टी जाहीर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अनंत चतुर्दशीनिमित्त गणरायाला आपण मनोभावे निरोप देऊ. विसर्जन मिरवणुकीतही नेहमीप्रमाणे शिस्त पाळावी आणि शांतता, सद्भावनेच्या वातावरणात गणेश विसर्जन पार पाडावे, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी राज्यातील गणेशभक्तांना केले आहे. ईद-ए-मिलादचे उत्सव पर्व सौहार्द-सलोखा घेऊन येईल. यातून परस्परांतील आदर-प्रेमभाव आणि स्नेह वाढीस लागावा,अशी मनोकामना व्यक्त करत मुख्यमंत्र्यांनी ईद-ए-मिलादच्या शुभेच्छा दिल्या. 'प्रेषित मोहम्मद पैगंबर यांनी जगाला त्याग आणि प्रेमाचा संदेश दिला. त्यांचे जीवन हाच एक मोठा संदेश आहे. त्यातून प्रेरणा घेऊन आपण परस्पर आदर-प्रेमभाव वाढीस लावण्याचा प्रयत्न करूया,' असेही आपल्या शुभेच्छा संदेशात म्हणाले.

# धर्माबादेत धनगर समाजाचे शेळ्या, मेंढ्यांसह रास्ता रोको आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**
**धर्माबाद :** चौंडी येथील उपोषणास बसलेल्या समर्थनार्थ व धनगर समाजाला अनुसूचित जमाती ( एसटी) मध्ये समाविष्ट करून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी यासाठी धर्माबाद येथील रेल्वे गेट क्रमांक दोन परीसरात दि.२६ सप्टेंबर २०२३ रोजी धनगर समाज बांधवांनी शेळ्या व मेंढ्या सह रास्ता रोको आंदोलन करून निवेदन नायबतहसिलदार गावंडे यांना देण्यात आले आहे.
शहरातील नटराज टॉकीज परीसरात असलेल्या खंडोबा मंदिरात धनगर समाज बांधवांनी पूजन करून नरेंद्र चौक, पानसरे चौक मार्ग रेल्वे गेट क्रमांक दोन पर्यंत पुण्यश्लोक आहील्याबाई होळकर, भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा घेऊन ढोलताशा गाजत आदिवासी वेशभूषेत भव्य मोर्चा काढण्यात आला आहे. यावेळी येळकोट येळकोट जय मल्हार, आरक्षण आमच्या हक्काचे, नाही कुणाच्या बापाचे, धनराज समाजाचा विजय असो, या घोषणा देण्यात आले आहे. यावेळी शासनाचे निषेध करण्यात आले आहे. तसेच रास्ता रोको आंदोलनात शेकडो शेळी व मेंढ्या रस्त्यावर आणल्या होत्या.यावेळी धनगर समाजाचे नेते आमदार गोपीचंद पडळकर यांच्या प्रतिमेचेवर दुग्ध अभिषेक करण्यात आले. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक गोविंद सोनटक्के, मारोती डेबेकर, एकनाथ जिंकले, गिरमाजी सुर्यकार ,बिरप्पा मदनूरकर, नागनाथ जिंकले, संजय बोडके, बालाजी तुकडेकर, शिवदर्शन दाणेकर, राजाराम दाणेकर,इरेश सुर्यकार,राम सुर्यकार सायन्ना डेबेकर सावित्रीबाई सुर्यकार, लक्ष्मीबाई सोनटेनकर यांच्या सह शेकडोंच्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते. सदरील रास्ता रोको आंदोलन शांततेत पार पडला असून पोलिस निरीक्षक अभिषेक शिंदे यांनी मोठा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



# भाजपचे ‘मिशन 45’

आधुनिक केसरी

देशात पुढच्या वर्षी लोकसभेची निवडणूक पार पडणार आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आलाय. प्रत्येक पक्षाच्या गोटात जोरदार हालचाली घडत आहेत. विशेष म्हणजे भाजप पक्षातून मोठी बातमी समोर आलीय. भाजपने महाराष्ट्रात ‘मिशन 45’ सुरु केले आहे. महाराष्ट्रात लोकसभेच्या एकूण 48 जागा आहेत. यापैकी 45 जागांवर आपले उमेदवार निवडून आणायचेच, असा निर्धार भाजपकडून करण्यात आलाय. त्यामुळे भाजपच्या गोटात जोरदार हालचाली सुरु झाल्या आहेत. भाजपला 2024 ची लोकसभा निवडणूक कोणत्याही परिस्थितीत जिंकायचीच आहे. त्यासाठी भाजपकडून सर्वोतोपरी प्रयत्न केले जात आहेत. याच प्रयत्नांचा भाग म्हणून भाजप आता विद्यमान खासदारांपैकी काही खासदारांचे आगामी निवडणुकीत तिकीट कापण्याची दाट शक्यता आहे. सूत्रांकडून याबाबत महत्त्वाची माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे भाजपमधील काही खासदारांची धाकधूक वाढली आहे. काही खासदारांचे तिकीट कापले गेले तर ते बंड पुकारून दुसऱ्या पक्षाच्या तिकीटावर किंवा अपक्ष निवडणूक लढतील का? ते पाहणे देखील महत्त्वाचे ठरणार आहे. अर्थात तसे झाले तर भाजपचेच नुकसान होणार आहे. कारण त्यामुळे मते विभागली जाण्याची शक्यता आहे. आगामी काळात याबाबत अनेक घडामोडी घडण्याची शक्यता आहे. पण सध्या सूत्रांकडून मिळालेली माहिती भाजप खासदारांसाठी धोक्याची घंटा मानली जात आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सुमार कामगिरी असलेल्या भाजप खासदारांचे तिकीट कापले जाणार आहे. लोकसभेसाठी भाजपकडून नव्या चेहऱ्यांची चाचपणी सुरु आहे. विशेष म्हणजे मुंबईत सुद्धा काही जागांवर बदल होण्याची शक्यता आहे. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या दौऱ्यात खासदारांच्या कामगिरीचा आढावा घेण्यात येतोय. जे. पी. नड्डा हे नुकतेच मुंबई आणि पुणे दौऱ्यावर आले होते. या दरम्यान जे. पी. नड्डा यांची भाजपच्या महाराष्ट्रातील दिग्गज नेत्यांसोबत बैठक पार पडली. या बैठकीत जे. पी. नड्डा यांनी लोकसभा मतदारसंघाचा आढावा घेतल्याची चर्चा आहे. याशिवाय केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे देखील दोन दिवसांपूर्वी मुंबईच्या दौऱ्यावर आले होते. ते लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी आले होते. यावेळी अमित शाह यांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बंद दाराआड चर्चा झाल्याची माहिती समोर आली होती.

# युद्ध निर्वासितांना विस्थापनाचा करावा लागतोय सामना



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**जिनिव्हा येथे निर्वासितांच्या समस्यांवरील यूएन उच्च आयोगाच्या (NHCR) जागतिक ट्रेंड अहवालाचे प्रकाशन करताना, UN निर्वासित एजन्सीचे प्रमुख फिलिपो ग्रँडी म्हणाले की, 'छळ आणि मानवी हक्कांच्या उल्लंघनामुळे सुमारे 11कोटी लोकांना आपले घर सोडावे लागले आहे. ही गोष्ट आपल्या जागतिक परिस्थितीला लांच्छनास्पद आहे. 2022 मध्ये सुमारे 1.9 कोटी लोक विस्थापित झाले, त्यापैकी 1.1 कोटींहून अधिक लोकांनी युक्रेनवर रशियाच्या आक्रमणामुळे आपली घरे सोडली.दुसऱ्या महायुद्धानंतर पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या संख्येने लोक युद्धामुळे विस्थापित झाले आहेत. खरं तर हे आणीबाणीचेच लक्षण आहे, असे म्हणावे लागेल. अल्पावधीतच पस्तीस प्रकारच्या आपत्कालीन घटना समोर आल्या आहेत, ज्या गेल्या काही वर्षांच्या तुलनेत तीन ते चार पटीने अधिक आहेत.**

ग्रँडी यांनी असा युक्तिवाद केला की सुदानमधून पाश्चात्य नागरिकांना हद्दपार केल्यानंतर, तेथे सुरू असलेल्या संघर्षाच्या बातम्या बहुतेक वर्तमानपत्रांमधून गायब झाल्या आहेत. सुदानमधील या संघर्षामुळे एप्रिल 2023 पासून 20 लाख लोक विस्थापित झाले आहेत. त्याच वेळी, रिपब्लिक ऑफ काँगो, इथिओपिया आणि म्यानमारमधील संघर्षामुळे प्रत्येकी 10 लाख लोकांना त्यांचे मूळ निवासस्थान आणि देश सोडण्यास भाग पाडले गेले आहे. मात्र, सकारात्मक माहिती देताना त्यांनी समाधान व्यक्त केले की, '2022 मध्ये एक लाख 14 हजार निर्वासितांचे पुनर्वसन करण्यात आले, जे 2021 च्या तुलनेत दुप्पट आहे. रशिया-युक्रेन युद्धाच्या दहा दिवसांनंतर, संयुक्त राष्ट्रांच्या निर्वासितांसाठी उच्च आयोगाने अहवाल दिला की हवाई आणि क्षेपणास्त्र हल्ल्यांपासून वाचण्यासाठी दहा लाखांहून अधिक नागरिक युक्रेनमधून पळून गेले आहेत. गेल्या शतकात इतक्या वेगाने स्थलांतर कुठेही झालेले नाही. हे लोक रोमानिया, पोलंड, मोल्दोव्हा, स्लोव्हाकिया, हंगेरी आणि बेलारूसमध्ये आश्रय घेत आहेत. त्यापैकी सर्वाधिक 6.5 लाख लोक पोलंडमध्ये आश्रयाला गेले आहेत. काही लोक जवळच्या रशियाच्या सीमा भागातही गेले आहेत.

सर्वात कमी शरणार्थी बेलारूसमध्ये पोहोचले आहेत. कारण बेलारूस हा रशियाचा मित्र देश आहे. जागतिक बँकेच्या मते, 2020 च्या अखेरीस युक्रेनची लोकसंख्या 4.4 कोटी होती. एनएचसीआरला भीती आहे की जर परिस्थिती आणखी बिघडली तर चाळीस लाखांहून अधिक युक्रेनियन नागरिकांना शेजारच्या देशांमध्ये आश्रय घेण्यास जावं लागेल. यापूर्वी 2011 मध्ये सीरियामध्ये सुरू झालेल्या गृहयुद्धामुळे मोठ्या प्रमाणात स्थलांतर सुरू झाले, जे 2018 मध्ये अमेरिकेने केलेल्या हल्ल्यापर्यंत सुरूच होते. अमेरिकेने आपले मित्र राष्ट्र ब्रिटन आणि फ्रान्ससह सीरियावर क्षेपणास्त्र हल्ला केला होता. सीरियामध्ये असलेल्या रासायनिक शस्त्रांचा साठा नष्ट करण्याच्या उद्देशाने 105 क्षेपणास्त्रे डागण्यात आली होती. अमेरिका, ब्रिटन आणि फ्रान्सची ही क्षेपणास्त्रे राजधानी दमास्कस आणि होम्सवर डागण्यात आली. यामध्ये रासायनिक शस्त्रांची भांडारे आणि वैज्ञानिक संशोधन केंद्रांना लक्ष्य करण्यात आले.त्यामुळे अनेक इमारतींना आग लागली आणि दमास्कस धुराने झाकोळले गेले. युक्रेनमध्ये रशियन हल्ल्यामुळे आजकाल असेच दृश्य पाहायला मिळत आहे.जैविक आणि रासायनिक शस्त्रांच्या भीतीने अमेरिकेने इराकवरही हल्ला केला होता.

सुमारे साडेसात वर्षे चाललेल्या सीरिया युद्धात पाच लाखांहून अधिक लोक मारले गेले. निर्वासित म्हणून एक कोटी लोकांना विस्थापनाचा फटका सहन करावा लागला, त्यापैकी 67 लाख लोक अजूनही अनेक देशांमध्ये निर्वासित आहेत. धर्मांधतेमुळे हे निर्वासित ज्या देशांमध्ये राहत आहेत, तेथेही ते अडचणीचे कारण बनले आहेत. जर्मनीने जास्तीत जास्त विस्थापित लोकांना आश्रय दिला होता. खरं तर, 7 एप्रिल 2018 रोजी रासायनिक हल्ल्यात सत्तर नागरिकांचा मृत्यू झाल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी सूडाची कारवाई करण्यासाठी पुढाकार घेतला होता. तोही त्यांनी निष्कर्षापर्यंत नेला होता. कदाचित त्यामुळेच रशियाचे उपपंतप्रधान अर्काडी व्होर्कोविच यांनी ट्रम्प यांना प्रत्युत्तर देताना 'आंतरराष्ट्रीय संबंध एखाद्या व्यक्तीच्या स्वभावावर अवलंबून नसावेत' असे म्हटले होते. व्लादिमीर पुतिनही युक्रेन युद्धात ट्रम्पसारखे वागत आहेत आणि अमेरिकेसारखे बलाढ्य देश या आगीत तेल ओतण्याचे काम करत आहेत. म्हणूनच युद्ध सुरूच आहे.



युक्रेनच्या NHCR (राष्ट्रीय मानवाधिकार आयोग) प्रतिनिधी कॅरोलिना म्हणाल्या की 'जग शेजारच्या देशांमध्ये आश्रय घेतलेल्या लोकांच्या डेटाकडे पाहत आहे, परंतु हे समजून घेणे महत्त्वाचे आहे की सर्वाधिक प्रभावित लोक अजूनही युक्रेनमध्ये आहेत. आमच्याकडे या अंतर्गत विस्थापित नागरिकांबद्दल कोणताही विश्वसनीय डेटा नाही. NHCR म्हणते की लाखो लोकांना देशामध्ये विस्थापन आणि दहशतीचा फटका सहन करावा लागला आहे, जे सध्या ट्रेन, बस, कार किंवा बंकरमध्ये राहून आपला जीव वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत. संयुक्त राष्ट्र निर्वासित संस्थेच्या जागतिक अहवालानुसार, विस्थापन संकट वीस वर्षांपूर्वीच्या तुलनेत दुप्पट झाले आहे. 2019 पर्यंत, अंतर्गत विस्थापितांची एकूण संख्या 4 कोटी 13 लाख होती. त्यापैकी 1 कोटी 36 लाख लोक असे आहेत ज्यांना 2018 मध्ये विस्थापित व्हावे लागले होते. हे खरे आहे की विकसित देश त्यांच्या वर्चस्वासाठी युद्धाची परिस्थिती निर्माण करतात, कारण अमेरिका आणि रशिया यांच्यातील वर्चस्वाचा लढा आपण युक्रेनच्या दृष्टिकोनातून पाहत आहोत. हे तेच देश आहेत ज्यांनी 1993 पर्यंत तिसरी आण्विक शक्ती असलेल्या युक्रेनला 1994 मध्ये बुडापेस्ट अण्वस्त्र प्रसारबंदी करारावर स्वाक्षरी करायला भाग पाडले आणि त्यांची सर्व अण्वस्त्रे समुद्रात नष्ट केली. या करारासाठी अमेरिका आणि ब्रिटनने युक्रेनला तयार केले होते आणि या देशांसोबत रशियानेही सहमती दर्शवली आणि युक्रेनच्या सुरक्षेची हमी दिली होती. मात्र आता रशियाने थेट युक्रेनवर हल्ला केला असून अमेरिका आणि ब्रिटन लांब राहून तमाशा पाहत आहेत. असे असूनही, हे तेच श्रीमंत देश आहेत जे मोठ्या संख्येने युद्ध आणि पर्यावरण निर्वासितांना आश्रय देतात. 2015 मध्ये, लाखो लोकांनी सीरियातील हिंसाचारापासून वाचण्यासाठी महिला आणि मुलांसह भूमध्य समुद्र पार करून आपला जीव धोक्यात घालून ग्रीस आणि इटलीमध्ये आश्रय घेतला होता. या दोन्ही देशांनी तेव्हा म्हटले होते की, काळाचा विचार करता निर्वासितांना आश्रय देण्यासाठी धोरण तयार करणे आवश्यक आहे. व्हेनेझुएलामध्ये राजकीय आणि आर्थिक अस्थिरतेमुळे चाळीस लाखांहून अधिक लोकांनी पलायन केले होते. त्यापैकी जेमतेम पाच लाख लोकांना औपचारिक निर्वासितांचा दर्जा आहे. युद्ध आणि गृहयुद्धाच्या परिस्थितीमुळे सीरियातील सर्वाधिक 67 लाख, अफगाणिस्तानमधून 27 लाख, दक्षिण सुदानमधून 23 लाख, म्यानमारमधून 11 लाख आणि सोमालियातील 9 लाख लोकांनी विविध विकसित देशांच्या सीमावर्ती भागात शरणार्थी म्हणून आश्रय घेतला आहे. बांगलादेश आणि म्यानमारमधील गृहयुद्धांतून पलायन केलेल्या सुमारे चार कोटी लोकांनी भारतात घुसखोरी केली आहे. संयुक्त राष्ट्र निर्वासित एजन्सीच्या 2019 च्या अहवालानुसार, एकूण 7 कोटी 95 लाख विस्थापित लोकांपैकी 4 कोटी 57 लाख जातीय, नस्लीय, वांशिक हिंसाचार आणि पर्यावरणीय आणि नैसर्गिक आपत्तींमुळे त्यांच्याच देशात विस्थापनाला सामोरे जात आहेत. बलाढ्य देशांच्या लहरीपणामुळे कमकुवत देशांवर युद्ध लादले जाते आणि लाखो लोकांना निर्वासितांचे शापित जीवन जगावे लागते, ही बाब चिंताजनक म्हटली पाहिजे.

# गानकोकिळा लतादीदी



माधव पि. बैलकवाड
संपर्क क्र. 8080471642

आधुनिक केसरी

**आपल्या मंजुळ आवाजाने संपूर्ण जगाला मोहिनी घालणारी भारताची गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांची आज जयंती. लता मंगेशकर यांचा आवाज म्हणजे जगातील आठवे आश्चर्य होते. त्यांचा आवाज म्हणजे रसिकांसाठी मोठी पर्वणीच होती. लता मंगेशकर यांचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ रोजी इंदूर येथे एका गोमंतकीय कुटुंबात झाला. लता दिदींना गायनाचा वारसा त्यांच्या वडिलांकडून मिळाला. त्यांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे शास्त्रीय गायक आणि नाट्य अभिनेते होते. त्यांच्या वडिलांकडूनच त्यांनी गायनाचे धडे गिरवले.**

तेच त्यांचे गायनातील पहिले गुरू होते. लता दिदींना लहानपणी हेमा नावाने हाक मारली जायची पण मास्टर दीनानाथ यांच्या एका नाटकातील नाव लतिका असे होते या नावावरूनच त्यांनी त्यांचे नाव लता असे ठेवले. हेच नाव आज जगातील आठवे आश्चर्य ठरले. आपल्या वडिलांच्या संगीत नाट्यात त्यांनी वयाच्या पाचव्या वर्षी काम केले. वयाच्या तेराव्या वर्षी लता दीदींनी गायन क्षेत्रात पाऊल ठेवले आणि १९४२ साली त्यांनी आपले पहिले गाणे रेकॉर्ड केले. किती हसाल ? या चित्रपटातील नाचू या गडे खेळू सारे..... हे गाणे त्यांनी गायले मात्र या गाण्याचा चित्रपटात समावेश झाला नाही. त्याचवर्षी मंगळागौर या चित्रपटात नटली चैत्राची नवलाई.... हे गाणे गायले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी काही मराठी चित्रपटात गाणी गायली. लता दिदींचे खूप गाजलेले पहिले गाणे म्हणजे १९४९ सालच्या महल चित्रपटातील खेमचंद प्रकाश या संगीतकाराने स्वरबद्ध केलेले आयेगा आनेवाला.... हे गाणे इतके लोकप्रिय झाले की त्यांच्याकडे संगीतकरांची रांग लागली. त्यांनी गायलेली गाणी लोकप्रिय होऊ लागली. १९५० नंतर दिदींचा उत्कर्षाचा काळ सुरू झाला. त्या काळातील नौशाद, सज्जाद, वसंत देसाई, दत्ता डावजेकर यासारखे जुने आणि त्या काळात उदयाला येणारे एस डी बर्मन, सी रामचंद्र, शंकर - जयकिशन, मदन - मोहन, उषा खन्ना, कल्याणजी - आनंदजी, रवी, लक्ष्मीकांत - प्यारेलाल, आर डी बर्मन अशा सर्वच संगीतकारांकडे दीदी गाऊ लागल्या. या सगळ्यांकडे गायलेल्या दिदींच्या गाण्याला अमाप लोकप्रियता मिळत गेली. त्यांच्या आवाजाने रसिक तृप्त होत गेले. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. त्या युद्धात भारताचे शेकडो जवान धारातीर्थी पडले. या शहीद जवानांना श्रद्धांजली वाहण्यासाठी २७ जून १९६३ रोजी दिल्लीत एक समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी एक खास गीत कवी प्रदीप यांनी लिहिले आणि सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केले होते. ते गीत लता दीदींनी गायले. ते गीत आजही लोकप्रिय असलेले ये मेरे वतन के लोगो....... हे गीत ऐकून तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना आपले आश्रू आवरता आले नाही. मराठीतही दीदींनी असंख्य गाणी गायली. आनंदघन या नावाने दीदींनी काही चित्रपटांना संगीतही दिले. जवळपास सात दशके आपल्या मंजुळ आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या लता दीदींनी जवळपास एक हजार चित्रपटातून ३० हजारांहून अधिक गाणी गायली. मराठी, हिंदीसह २० हुन अधिक प्रादेशिक भाषेत त्यांनी गाणी गायली. मधुबाला, नूतन, मीना कुमारी पासून श्रीदेवी, माधुरी, जुही ते काजोल, करिश्मा, करीना कपूरपर्यंत सर्व अभिनेत्रींना त्यांनी आवाज दिला. त्यांच्या गायन कलेची दखल घेऊन सरकारने त्यांना अनेक मानाचे पुरस्कार दिले. १९६९ साली भारत सरकारने त्यांना देशाचा सर्वोच्च तिसरा नागरी पुरस्कार पद्मभूषण देऊन गौरवले. १९९९ साली देशाचा सर्वोच्च दुसरा नागरी पुरस्कार पद्मविभूषणने गौरविण्यात आले. २००१ मध्ये त्यांना त्यांच्या संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल भारतरत्न या सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरविण्यात आले. एम एस सुब्बालक्ष्मी नंतर या पुरस्काराने गौरविण्यात आलेल्या त्या केवळ दुसऱ्या गायिका होत्या. त्यांना दादासाहेब फाळके हा चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार देखील मिळाला आहे. फ्रांस सरकारने ऑफिसर ऑफ लिजन ऑफ ऑनर या त्यांच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने त्यांना गौरविले आहे. लता दिदींना तीन वेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तर चार वेळा फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला. फिल्मफेअर कडून त्यांचा दोनदा विशेष सन्मान करण्यात आला. कालांतराने त्यांनी नवीन गायकांना पुरस्कार मिळावा या हेतूने पुरस्कार स्वीकारणेच सोडून दिले. १९९२ साली महाराष्ट्र राज्य सरकारने लता मंगेशकर यांच्या नावाने पुरस्काराची सुरवात केली तर मध्यप्रदेश सरकारने १९८४ सालापासूनच लता मंगेशकर पुरस्कार देण्याची परंपरा सुरू केली. लता दिदींना अनेक विद्यापीठांनी मानाची डिलीट पदवी देऊन गौरविले. यावर्षी ६ फेब्रुवारी रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धपकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण देश स्तब्ध झाला. त्यांच्या निधनाने केवळ भारतातच नव्हे तर जगभर हळहळ व्यक्त केली गेली. लता दिदींशीवाय भारतीय चित्रपट सृष्टीचा आणि संगीत कलेचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. आपल्या अलौकिक स्वरांनी चित्रपट सृष्टीवरच नव्हे तर संपूर्ण देशावर वेगळा ठसा उमटवणाऱ्या लता दिदींचे संगीत क्षेत्रातले योगदान पुढील १०० पिढ्यांना विसरता येणार नाही.जगभरातील कोट्यवधी संगीत प्रेमींच्या कानाला तृप्त करणारा दैवी स्वर आज हरपला असला तरी त्यांच्या आवाजाच्या परिसस्पर्शाने अजरामर झालेल्या गीतांच्या माध्यमातून हा स्वर अनंतकाळ आपल्या मनामध्ये गुंजन करत राहणार आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# मंत्री बावनकुळेंच्या निषेधार्थ पत्रकारांचे तहसीलदारांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** पत्रकारांच्या संदर्भात बेताल वक्तव्य करणाऱ्या बावनकुळेचा निषेध करत २७ सप्टेंबर रोजी तालुक्यातील पत्रकार बांधवांनी तहसिलदार सोलाट यांना निवेदन देत कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.

तीन दिवसा अगोदर नगर येथील कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात कार्यकर्त्यांना सल्ला देत आपल्या विरोधातील बातम्या दाबण्याकरिता पत्रकारांना चहा प्यायला न्या त्यांना नाष्टा करायला न्या अशा प्रकारचं वक्तव्य करत पत्रकारांच्या प्रतिमेला मलीन करण्याचं काम केलं आहे.चंद्रशेखर बावनकुळे हे एक राष्ट्रीय पक्ष असलेल्या पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष असून त्यांनी पत्रकारांच्या संदर्भात अशा प्रकारचं अशोभनीय वक्तव्य केले आहे.त्यांच्या या वक्तव्याचा संपूर्ण महाराष्ट्रातून पत्रकार बांधवांच्या वतीने निषेध करण्यात येत आहे.

२७ सप्टेंबर रोजी जळगाव जामोद तालुक्यातील सर्व प्रिंट इलेक्ट्रॉनिक मीडियातील सर्व पत्रकार बांधवांनी बावनकुळे यांचा निषेध करत त्या संदर्भातले निवेदन जळगाव जामोदच्या तहसीलदारांना दिले आहे. निवेदनात बावनकुळे यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी असे सुद्धा म्हटले आहे यावेळी तालुक्यातील सर्व प्रिंट इलेक्ट्रॉनिक मीडियातील सकाळ वर्तमानपत्राचे तालुका प्रतिनिधी ज्येष्ठ पत्रकार गुलाबराव इंगळे, सागर झनके,अश्विन राजपूत, राजेश बाठे, विनोद वानखडे, अनिल भगत, संतोष कुलथे, संतोष मांजरे,दत्तू दांडगे, नागेश भटकर, शिवदास सोनवणे, जाफरखान, मनीष ताडे,सुरेश कलंत्री ,किशोर दाताळकर,अमर तायडे आदी पत्रकार हजर होते.



# 'लालबागचा राजा'ची दरडग्रस्तांच्या वेदनांवर मायेची फुंकर

## अनाथ मुलांचा विश्वासाने धरला हात




आधुनिक केसरी न्यूज

**रवींद्र मालुसरे**

**मुंबई :** मुंबईतील गणेशोत्सवादरम्यान सर्वांच्या नजरा प्रसिद्ध 'लालबागच्या राजा'कडे लागल्या असतात. लालबागच्या राजाला 'नवसाचा गणेश' अशी ख्याती आहे. ज्या काळात स्वातंत्र्यलढा शिखरावर होता त्या काळात मंडळाची स्थापना झाली. मुंबईसह देश-विदेशातील गणेशभक्त लालबागचा राजाच्या चरणी लाखो भक्त नतमस्तक होत असतात, लालबागचा राजाचे यंदा हे ९० वे वर्ष असून, सोबतच भक्तांसाठी मंडळाकडून विविध सामाजिक उपक्रम राबवले जातात. 'पान-सुपारी' हा त्यातील एक वैशिष्ट्यपूर्ण आणि लालबागच्या राजाच्या परंपरेतील महत्त्वाचा कार्यक्रम असतो. 'आम्ही तुमच्या पाठीशी आहोत, आपले लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आणि देशभरातील 'राजा'चे तमाम गणेशभक्त तुमच्या दुःखात सहभागी आहेत. आता पुन्हा मोठ्या जोमाने उभे राहायचे आहे. समोर आलेल्या अडचणींवर मात करून दुःखाचा डोंगर सर करून आपल्याला पुढे जायचे आहे. या प्रवासात आम्ही सर्व तुमच्या साथीला आहोत', अशा शब्दांत 'लालबागचा राजा' मंडळाने इर्शाळवाडीतील दरडग्रस्तांना धीर देत इर्शाळगाडीवासीयांनी भोगलेल्या वेदनांवर, त्यांच्या जखमांवर 'लालबागचा राजा'ने मायेची फुंकर घातली. निमित्त होते, पान-सुपारी'मध्ये मंडळाकडून आपले सामाजिक दायित्व जपले जाते. यापूर्वीही २००५ मध्ये दासगाव येथील जुई दरडग्रस्थ गाव नव्याने उभारण्यात मंडळाने माजी आमदार स्व माणिकराव जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली घेऊन नव्याने उभे केले होते.

जुलै महिन्यात रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातल्या इर्शाळवाडीवर मुसळधार पावसामुळे डोंगराचा वरचा कडा तुटून पडला. घरे राडारोड्याखाली गाडली गेली. दुर्दैवी इर्शाळवाडीच्या दुर्घटनेत अनेक कुटुंब उद्ध्वस्त झाली. जी वाचली त्यातली काही कायमची जायबंदी झाली, तर काही मुले अनाथ झाली. या सर्व आपत्तीग्रस्तांना लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाकडून आर्थिक मदत करण्यात आली आहे. मंडळाकडून इर्शाळवाडीतील २९ कुटुंबातील वाचलेल्या सदस्यांना पन्नास हजार रुपयांचा डिमांड ड्राफ देण्यात आला आहे. तसेच २२ अनाथ मुलांच्या नावाने प्रत्येकी पन्नास हजार रुपयांची एफडी बनवण्यात आली आहे. उत्सव मंडळ या सर्व मुलांच्या पाठीशी आहे', 'लालबागाचा राजा' मंडळाने मदतीसाठी खारीचा वाटा उचलला आहे. अशी प्रतिक्रिया मंडळाचे मानद सचिव सुधीर साळवी यांनी यानिमित्ताने व्यक्त केली.

मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब कांबळे प्रतिक्रिया देताना म्हणाले की, जगात मदतीची भावना कमी झाली आहे असा सूर नेहमीच ऐकू येतो. परंतु या गोष्टींना छेद देणारे सुखद अनुभव मंडळाच्या वतीने देत असतो. त्यामुळे सदभाव जगात कायम असल्याची भावना मनात ठसते. आपले समाजाविषयी काही देणे लागते, या उदात्त व शुद्ध भावनेने समाजातील उपेक्षित घटक, वनवासी यांना यथाशक्ती मदत करण्याची मनात खूणगाठ बांधून असतो. "स्वतःसाठी सर्वच जगतात, पण स्वतःसाठी व इतरांसाठी जगणे यात वेगळाच आनंद आहे व आत्मिक समाधान आहे. संस्थेच्या माध्यमातून एखाद्याच्या जीवनात थोडासा आनंद निर्माण करण्याचा आमचा प्रयत्न आहे. या कार्यास मंडळाच्या सर्व सहकाऱ्यांचे आणि भाविक भक्तांचेसुद्धा मोठे योगदान आहे.

# जळगाव जामोद येथे शांतता समितीची बैठक

आधुनिक केसरी न्यूज



**जळगाव जा :** आगामी गणेश विसर्जन व ईद-ए-मिलाद या सणाच्या पार्श्वभूमीवर२७सप्टेबर रोजी जळगाव जामोद येथील सांस्कृतिक भवन येथे तालुक्यातील पोलीस प्रशासनाच्या वतीने अशोक थोरात अप्पर पोलीस अधीक्षक खामगाव यांच्या मार्गदर्शनाखाली शांतता बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.


शांतता बैठकीला संबोधित करताना अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांनी सांगितले की, गणेश विसर्जनाचा सोहळा अतिशय महत्त्वाचा असून त्यासाठी पोलीस प्रशासनाच्या वतीने सर्वतोपरी तयारी करण्यात आली आहे. मिरवणुकी दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सर्वांनी शांततेचे सहकार्य करावे. मिरवणुकीत दारू पिऊन धिंगाणा घालणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करण्यात येईल. मिरवणूक मध्ये सर्वांनी शांतता ठेवत सहकार्य करावे. जळगाव जामोद शहर आणि ग्रामीण भागातील गणेश मंडळांनी पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे. पोलीस बांधव सुद्धा समाजाचा एक घटकच आहेत त्यांना सुद्धा सण उत्सवा दरम्यान आपले कर्तव्य पार पाडावे लागतात. पुढे बोलताना त्यांनी सांगितले की संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यातील मुस्लिम बांधवांचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे. गणपती विसर्जनाच्या दिवशी मोहम्मद पैगंबर यांची जयंती येत असून ती जयंती त्यादिवशी साजरी न करता दोन दिवसानंतर साजरी करण्याचे जिल्ह्यातील सर्व मुस्लिम बांधवांनी ठरवले आहे. मुस्लिम बांधवांनी जपलेला हा सामाजिक एकोपा नक्कीच प्रेरणादायी असाच आहे. यावेळी उपविभागीय अधिकारी देवराम गवळी तहसीलदार शितल सोलाट, दत्ता पाटील, प्रशांत तायडे, अजय वानखडे, सचिन देशमुख, अब्दुल गफार अब्दुल कादीर, मौलाना मोहम्मद साजिद रजा यांनी सुद्धा आपले विचार व्यक्त केले.

शांतता बैठकीला जेष्ठ पत्रकार कांडेलकर सर, शिवसेनेचे गजानन वाघ, पर्वताबाई इंगळे,तालुक्यातील पोलीस पाटील यासह तालुक्यातील व शहरातील मोठ्या प्रमाणावर बांधव हजर होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पोलीस निरीक्षक दिनेश झांबरे यांनी तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अप्पर पोलीस निरीक्षक पांडुरंग इंगळे यांनी केले.




महाराष्ट्र Business Katta










# माझा अद्भुत महाराष्ट्र- एक प्रवास वर्णन

आधुनिक केसरी

**राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा नाजुक देशा, कोमल देशा, फुलांच्याहि देशा भूगर्भातून नैसर्गिक उद्रेकामुळे बाहेर पडून थंड झालेल्या लाव्हा रसांच्या थरांनी बनलेल्या राकट कणखर दगडांची भूमी म्हणजे महाराष्ट्र. आपल्या देशाची, राज्याची भौगोलिक, सांस्कृतिक माहिती व्हावी या विचाराने केलेलं पर्यटन खूपच आनंद देणार असतं... मुंबई, पुणे, भिमाशंकर आणि गेल्याच वर्षी गेलेली महाबळेश्वर रायगड सहल तर मी कधीच विसरू शकत नाही.**



रेवा, वरदा, कृष्ण, कोयना, भद्रा, गोदावरी एकपणाचे भरती पाणी मातीच्या घागरी अशा ओळी गुणगुणत माझे मन भिरभिरणाच्या फुलपाखरू प्रमाणे त्या आठवणीकडे वळाले. रात्रीचा प्रवास करून आम्ही सातारा जिल्हयातील डोंगराळ थंड हवामानात केव्हा प्रवेश केला ते कळालेच नाही. अजून त्या थंडीने अंग आणि मन शहारून येते. या वातावरणात शांता शेळके यांच्या पावसात खंडाळा कवितेतील, हिरवी झाडी, पिवळा डोंगर, निळी सावळी दरी बेट बाबूंचे त्यातून वाजे वाऱ्याची पावरी या ओळींची आठवण झाल्यावाचून राहत नाही. उंच शिखरे, खोल दव्या, हिरवागार निसर्ग, थंड पण उत्साहवर्धक हा परिसर पाहताना ढगांना पाहून मयूर जसा नाचतो तसेच काहीसे माझे झाले, आणि मी आनंदाने उड्या मारू लागले, अगदी लहान वर्गापासून महाराष्ट्रातील थंड हवेचे ठिकाण म्हटले की महाबळेश्वर, पाचगणी ही नावे ठरलेली असायची आज हया उंच समुद्रसपाटीपासून १२४० मी. उंचीवरून निसर्गाचे विलोभनीय दृश्य पाहून मी हरखून गेले. **बहु असोत सुंदर संपन्न की महा प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा।** अशीच काहीशी अवस्था माझी झाली होती. विविध प्रकारचे छायाचित्र काढून जगभरातील पर्यटक महाबळेश्वरला का? येतात याची प्रचिती मला झाली. माल्कम माऊंट आणि महाबळेश्वर क्लब बघून महाबळेश्वर पासून १९ कि.मी अंतरावर पाचगणीच्या दिशेने आमची गाडी वळाली हे ठिकाण पाच टेकड्यांनी वेढलेले असल्यामुळे याला पाचगणी म्हणतात. तेथील रेशीम संशोधन केंद्र आणि मनमुराद निसर्गाचा आनंद घेत सूर्याचे मावळते प्रतिबिंब इतके आकर्षक व मनमोहक होते की, लक्ष अजिबात विचलीत होत नव्हते. नकळत अलगद शब्द बाहेर पडतात, पिवळ्या तांबूस रंगामध्ये पक्षी करीत नादसोहळा कुठे बुडाला पलीकडे तो सोन्याचा गोळा. मावळत्या सूर्याला निरोप देत आम्ही मुक्कामाच्या दिशेने वळालो. सकाळ होताच सर्वांची लगबग आणि चैतन्यमय वातावरण झाले, त्याचे कारण ही तसेच होते.आम्हाला निघायचे होते रायगडाकडे महाराष्ट्रात जवळपास ३५० किल्ले आहेत. आणि त्यापैकी एक महत्त्वाचा किल्ला रायगड१६५६ मध्ये शिवाजी महाराजांचा राज्यभिषेक याच जिल्ह्यात झाला. गडावर पोहोचल्यानंतर नियुक्त केलेल्या गाईडने रायगडाचा इतिहास उलगडून सांगितला तेव्हा अभिमानाने छाती फुलून आली यशवंत, कीर्तिवंत, भाग्यवंत श्रीमंत योगी रयतेचा राजा छत्रपती शिवाजी महाराज की जय अशी गर्जना करत आलेल्या पर्यटकांमध्ये संचारलेली वीरश्री खरेच पाहण्यासारखी होती. उंच आणि वरील बाजूस निमूळत्या होत गेलेल्या डोंगरावर हा किल्ला बांधलेला होता. तिन्ही बाजूंनी असलेले खोरे याला सहयाद्री पर्वतापासून वेगळे करतो. किल्यापासून पाच कि.मी उंचीवर पश्चिमेस हिरकणी आजही मराठी माणूस ह्या हिरकणीपुढे नतमस्तक झालेला दिसतो. उत्तरेस टकमक टोक केलेल्या गुन्हयाला माफी नाही याचीच साक्ष जणू काही तो देत आहे तटबंदीच्या भिंती आणि दोन तोफखाने महादवाराजवळ मैदानावर मोठ्या इमारती आणि उंच टॉवर, त्याच्या मागे बालेकिल्ला आहे. त्यानंतर उजव्या बाजूस महाल, त्याच्या डाव्या बाजूस शिवाजी महाराजांचा दरबार आहे. मध्यभागी असलेल्या सिंहासनासमोर उभे राहून छायाचित्रे काढतांना झालेला आनंद शब्दात वर्णन करणे अशक्य आहे. त्याच्या समोर गेल्यास दोन रागांचा बाजार आणि जगदीश्वराचे मंदिर आहे. त्याला लागून शिवाजी महाराजांची समाधी आहे. १९६३ मध्ये महात्मा फुलेंनी महाराजांच्या समाधीचा शोध घेतला शेतकऱ्यांचा राजा अशी प्रतिमा त्यांना दिली.

हे सगळे पाहताना आमचा छत्रपती शिवाजी राजा आणि त्यांचे कर्तृत्व किती असामान्य होते याची प्रचिती येते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयघोषाने परिसर निनादत होता आलेले शिक्षक, विद्यार्थी राजा बढे यांची कविता तालासुरात गाऊ लागले.

काळ्या छातीवरी कोरली, अभिमानाची लेणी पोलादी मनगटे खेळती, खेळ जीवघेणी दारिद्र्याच्या उन्हात शिजला निढळाच्या घामाने भिजला देशगौरवासाठी झिजला दिल्लीचेही तक्त राखितो महाराष्ट्र माझा ।।

रोमांचकारी व आनंदाचे हे पर्यटनाचे दिवस कसे गेले समजलेच नाही. आयुष्यभराची आठवण मनात साठवून छत्रपती संभाजीनगरच्या परतीच्या प्रवासाला निघालो.

**सौ. शुभांगी हेमंत पांगरकर**
छत्रपती संभाजीनगर

# शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांचे प्रश्न दृष्टिक्षेपात



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**दिनांक ५सप्टेंबर, शिक्षक दिनाचे औचित्य साधून स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्त माननीय मंत्री शालेय शिक्षण महोदय यांच्या संकल्पनेचा अनुसरून शिक्षण सेवा पंधरवाडा आयोजित करावयचे ठरविले आहे व तसा आदेश शालेय शिक्षण विभागाकडून निर्गमित करण्यात आला आहे.शासन आपल्या दारी अंतर्गत सरकार शिक्षकांच्या,शिक्षकेत्तर कर्मच्याऱ्यांच्या ,विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या समस्यांवर चर्चा करून प्रलंबित प्रश्न सोडविणार असल्याचे शिक्षण विभागाच्या आदेशात म्हटले आहे. सरकार व शिक्षण विभागाचा हा निर्णय स्तुत्य व प्रशंसनीय आहे.मात्र खरचं या अभियानांतर्गत शिक्षक,विद्यार्थ्यांचे व पालकांचे प्रश्न सोडविले जाणार का,हा खरा प्रश्न आहे.**

शिक्षण क्षेत्रातील सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे शिक्षकांच्या भरतीचा व त्यांच्या नियुक्तीचा ,वरिष्ठ व निवड श्रेणीच्या वेतश्रेणीचा,दुय्यम सेवा पुस्तिकेचा,सेवा निवृत्ती पेन्शनचा व अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांच्या समायोजनाचा असे कितीतरी प्रश्न शिक्षण विभागाच्या दप्तरदिरंगामुळे व संस्था चालकांच्या मनमानी कारभारामुळे प्रलंबीत आहे. अनेक शाळांमध्ये शिक्षकांची नियुक्ती झाली असली तरी त्यांना अजूनही शिक्षण विभागाची मान्यता नसल्यामुळे ते बिनपगारी आहेत..अनेक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये शिक्षकांना सेवा पुस्तकाची दुय्यम प्रत देखील मिळालेली नाही. शिक्षकांच्या सेवेची संबंधित अतिशय महत्त्वाचा प्रश्न म्हणजेच शिक्षकांची नियुक्ती व शिक्षण विभागाच्या मान्यतेचा प्रश्न. शिक्षणाधिकारी व उपसंचालक कार्यालयात शिक्षकांच्या नियुक्तीचे प्रस्ताव धूळ खात पडलेले आहेत.

राज्यात २०११ मध्ये पटपडताळणी करण्यात आल्यानंतर पटसंख्येअभावी राज्यात मोठ्या प्रमाणात शिक्षक अतिरिक्त ठरले होते. या शिक्षकांचे इतरत्र समायोजन होत नाही तोपर्यंत शिक्षण संस्थाचालकांनी शिक्षक भरतीला बंदी केली होती. असे असतानाही संस्थाचालकांनी विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करून शिक्षकांची भरती केली होती. या शिक्षकांच्या मान्यतेचा प्रस्तावदेखील शिक्षण विभागाकडे पाठविण्यात आला आहे, मात्र कोणत्याही शिक्षकांना मान्यता मिळालेली नाही. त्यामुळे या शिक्षकांवर टांगती तलवार होतीच. आता शासनाने भरतीप्रक्रिया आपल्या हाती घेतल्याने तसेच अभियोग्यता आणि बुद्धिमत्ता चाचणीच्या आधारेच शिक्षकभरती राबविली जाणार असल्यामुळे २०१२ मध्ये नियुक्त शिक्षकांपुढे मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. शासनाने 'पवित्र' भरतीचा आदेश काढला असला तरी त्यात २०१२ नंतर नियुक्त शिक्षकांबाबत कोणताही उल्लेख नसल्यामुळे संस्थाचालकांचे रोस्टर भरतांना २०१२ मध्ये नियुक्त शिक्षकांच्या जागा ग्राह्य धरणार किंवा नाही याविषयी अद्यापही स्पष्टता नाही. २०१२ मध्ये ज्या संस्थाचालकांनी शिक्षकांची भरती केली त्या भरतीनंतर या शिक्षकांना मान्यता मिळेल असे सांगण्यात आले होते. काही संस्थाचालकांनी अशाप्रकारचे प्रस्ताव शिक्षण विभागाकडे पाठविलेदेखील होते. मात्र शिक्षण विभागाने या फाइल्स पुन्हा घेऊन जाण्याचे संस्थाचालकांना कळविले होते. विशेष म्हणजे शाळा आणि वर्गाची गरज म्हणून शिक्षकांची नेमणूक करण्यात आल्याचा दावा शैक्षणिक संस्थाचालक करीत असले तरी शासनाने ही प्रक्रियाच वेळोवेळी बेकायदेशीर ठरविली आहे.शिक्षकांची परवडसंस्थाचालकांनी शिक्षकांना नियुक्ती दिली असली तरी या शिक्षकांचा पगार अतिशय तुटपुंजा इतका आहे. तीन ते पाच हजार रुपयांवर या शिक्षकांना काम करावे लागत आहे. काही शिक्षकांना तर पाच-पाच वर्षांपासून पगारदेखील दिला जात नाही. पदाला मान्यता मिळाल्यानंतरच पगार सुरू होईल, असे सांगून शिक्षकांना विनावेतन काम करावे लागत आहे. शासनाने संस्थाचालकांची भरतीप्रक्रिया हाती घेतल्याने आता या शिक्षकांचे काय होणार याविषयी या शिक्षकांना चिंता लागली आहे.

शिक्षणापासून कोणत्याही विद्यार्थ्यांना प्रवेशापासून वंचित ठेवता येत नसताना देखील अनेक विद्यार्थी प्रवेशापासून वंचित आहे. शिक्षणाचा अधिकार कायदा २००९ मध्ये संसदेने संमत केला होता. एक एप्रिल २०१० रोजी देशभरात तो लागू झाला. प्रत्यक्ष अंमलबजावणी महाराष्ट्राच्या सर्व क्षेत्रांमध्ये २०१३पासून सुरू झाली. त्यानंतर दरवर्षी या शिक्षण हक्क कायद्यांतर्गत खासगी विनाअनुदानित शाळांमध्ये इयत्ता पहिलीसाठी प्रवेश सुरू झाले. मात्र सुरुवातीपासूनच याबाबत ओरड देखील केली गेली. खासगी विनाअनुदानित शाळांना शासन वेळेवर निधी देत नाही. त्यामुळे.अनेक. संस्था चालकांनी विद्यार्थ्यांना परीक्षेपासून वंचित ठेवले आहे..शासनाने विनाअनुदानित शाळांमध्ये जितके विद्यार्थी प्रवेश घेतील त्यांची सर्वांची फी त्या खासगी शाळांना वेळेत दिलेली नव्हती. त्यामुळे विद्यार्थ्यांना व पालकांना त्याचा त्रास सहन करावा लागला. तसेच काही विद्यार्थ्यांना फी नाही म्हणून शाळा संचालकांनी व्यवस्थापनाने फी आणल्याशिवाय शाळेत येऊ नका म्हणून असे सांगितले होते. तसेच काही विद्यार्थ्यांना परीक्षेला बसू दिले नव्हते. याबाबतच्या अनेक तक्रारी राज्य बाल हक्क आयोगाकडे प्राप्त झाल्या. त्यानंतर परीक्षेला बसण्यापासून रोखता येणार नाही, असा देखील निर्णय झाला. परंतु दरवर्षी विद्यार्थ्यांची संख्या रिक्त जागांपेक्षा अधिक आहे. त्यामुळे शासन याच्यावर गंभीरपणे अजूनही विचार करत नाही असे दिसते. माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर देखील शैक्षणिक सत्र २०२३-२४ मध्ये अनेक विद्यार्थी प्रवेशापासून वंचित आहे. इयत्ता अकरावी व बारावीसाठी शिक्षण विभागाने शहरी विभागासाठी केंद्रीय प्रवेश पद्धतीचा अवलंब केला.तकलादू तंत्रज्ञान, माहितीचा अभाव, शिक्षण विभागातील असमन्वय आदी कारणांमुळे अकरावीची केंद्रीय प्रवेश पद्धती विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांसाठी प्रचंड मनस्तापाची ठरत आहे. केंद्रीय प्रवेश पद्धतीच्या तांत्रिक अडचणीमुळे शहरी भागातील अनेक विद्यार्थी ग्रामीण भागाकडे धाव घेत आहे त्यामुळे शहरी कनिष्ठ महाविद्यालय ओस पडत आहे. विशेष म्हणजे विज्ञान शाखेतील विद्यार्थी खाजगी शिक्षा संस्थांत शिकवणी लावतात.अनेक शिक्षण संस्थांनी खाजगी शिकवणी वर्षासोबत हात मिळवली केल्यामुळे शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी वर्गामध्ये अनुपस्थित असतात. ग्रामीण भागात ज्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालये नामांकित आहेत.तिथे विद्यार्थी प्रवेशाचा प्रश्न उद्भवत नसतो. मात्र विद्यार्थ्यांचा कल अशा महाविद्यालयात प्रवेश




घेण्याचा असतो. परंतु शिक्षण विभागाला अतिरिक्त प्रवेशाचा प्रस्ताव सादर केल्या नंतर देखील शिक्षण विभाग वेगवेगळ्या कारणांसाठी प्रस्ताव रोखून धरत असते.. त्यामुळें विद्यार्थ्यांना अशा शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश मिळत नाही.शिक्षण क्षेत्राशी संबंधित अनेक प्रश्न तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर प्रलंबित आहेत.. या कारणासाठी त्यांना संबंधित कार्यरत वारंवार भेटी द्याव्या लागतात आणि या कारणामुळे त्यांचा अमूल्य वेळ देखील वाया जात असतो. शिक्षक व विद्यार्थ्यांचे प्रश्न विशिष्ठ वेळात सोडवायला पाहिजे. मात्र शासनाच्या दप्तर दिरंगामुळे व भ्रष्ट कारभारामुळे शिक्षकांच्या नियुक्तीचा, मान्यतेचा,वेतनाचा व विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा प्रश्न सतत उद्ववत असतो.

या पार्श्वभूमीवर शिक्षण विभागाने शिक्षण सेवा पंधरवाडा हा स्तुत्य उपक्रम आणला आहे .या उपक्रमात वरील घटकांच्या समस्यांवर चर्चा करून समाधान शोधणार का.? हा प्रश्न शिक्षक, विद्यार्थी व पालकांना भेडसावत आहे. शिक्षण क्षेत्रातील सर्वात महत्वाचा प्रश्न म्हणजे जिल्हा परिषदांच्या मराठी शाळांचा प्रश्न.कमी पटसंख्येच्या शाळा बंद करून त्या विद्यार्थ्यांचे समायोजन सरकार समूह शाळांमध्ये करणार आहे.समूह शाळांची संकल्पना चांगली असली तरी यामुळे अनेक विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. २० पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळा बंद करण्याचा निर्णय शासनाने मागे घ्यावा अशी मागणी पालक व शिक्षक करत आहे. विशेष म्हणजे शिक्षण संचालकांनी २० पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळांची माहिती सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार जिल्हा स्तरावरुन माहिती संकलित करुन पाठवली जात आहे. बालकांचा शिक्षणाचा मोफत व सक्तीचा अधिकारी कायद्यानुसार ६ ते १४ वयोगटातील मुलांना एक किलोमीटरच्या आता मोफत व सक्तीचे शिक्षण देणे बंधनकारक आहे. २० पटसंख्येच्या आतील शाळा या जवळच्या शाळेत समायोजित करण्याचा शासनस्तरावरुन चाललेला प्रयत्न वाडी-वस्तीवरील बालकांवर अन्यायकारक आहे. जवळच्या शाळेत जाण्यासाठी वाहतूक व्यवस्था उपलब्ध करुन देण्याचा शासनाचा मानस आहे.लहान बालकांना आपल्या गावातील शाळेत रूळण्यासाठी वेळ लागतो. अशी लहान बालके परगावी शिक्षणासाठी प्रवास करून पाठवणे मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून उचित नाही. तसेच त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वाडी-वस्तीवरील बालके शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून शासनाने वस्ती तेथे शाळा सुरू केल्या. त्यामुळे तेथील बालके शिक्षणाच्या प्रवाहात आली. शाळा बंद केल्यास तेथील बालके पुन्हा शिक्षणापासून वंचित राहतील. शिक्षणापासून वंचित राहण्याचा धोका शिक्षणतज्ञ म्हणतात कमी पटसंख्या असल्यामुळे शिक्षण दर्जेदार होते. त्यामुळे २० पटसंख्येच्या आतील शाळा बंद करण्याचा घाट कशासाठी. वाडी-वस्तीवरील शाळेतील पटसंख्या २० पेक्षा कमी असणे साहजिकच आहे. जिल्ह्यातील अनेक गावांमधील शाळांचा पट देखील २० पेक्षा खाली गेला आहे. परंतु गावातील शाळा बंद केल्यास बालके शिक्षणापासून वंचित राहण्याचा धोका आहे. त्यामुळे २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद न करण्याची मागणी शिक्षक व पालक करत आहे.

# बाप्पाला जल्लोषात निरोप देण्यासाठी भक्तगण सज्ज



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**विघ्नहर्ता, सुखकर्ता, म्हणजे आपल्या धर्म शास्त्रानुसार बुद्धी व कार्य सिद्धी चे दैवत गणपती बाप्पा असल्याने आपण कोणत्याही प्रकारच्या शुभ कार्याचा आरंभ करत असताना गणेशाचं पुजन करूनच करतो. म्हणून गणपती बाप्पा यांचं महत्त्व हे अनन्यसाधारण असं आहे. दरवर्षी येणारा गणेशोत्सव हा आपण सगळ्यांच्या साठी आनंदाचं पर्वच ठरतो .सगळ्यात बुद्धिमान मार्ग म्हणजे सगळ्यात एकरूप होणे.सगळ्या सोबत एकरूप असणे सतत योगात असणे.**

`वांचे दैव कैलासपती महादेव व जगद माता पार्वती यांचे पुत्र जगद वंदय दैवत म्हणजे गणपती बाप्पा संकष्ट चतुर्थी ते अनंत चतुर्दशी हा आनंद महोत्सव जल्लोषात साजरा केला जातो. अगदी गावा गावात घरा घरात जितके तिकडे चोहीकडे गणपती बाप्पा कुठंही पाहा धुमधाम फक्त गणपती बाप्पांचीच असते .संबंध वातावरण देखिल आनंदाने नाहुन निघतय .आता वेळ आली आहे ती बाप्पाला निरोप देण्याची निरोपाचा आनंद लुटायचा प्रयत्न लहान थोर अगदी मंत्रमुग्ध होऊन करतात.याचा निरागस आनंदाला आपण वर्षभर पोरके होणार या चिंतेने प्रत्येकाच्या चेहऱ्यावर बाप्पाला निरोप देण्याचा ताण तणाव देखिल जाणवतो .पण ताण तणाव व आनंद हा त्रिवेणी संगम विलक्षण पाहणयासारखा असतो . बाप्पाच अगमान झालं आनंद झाला .या आनंदाच्या वातावरणात आता निरोपाची वेळ देखिल समिप आली आहे .मनोमन वाटतंय बप्पा आपण जाऊ नका पण परंपरे नुसार उत्साह पुर्ण वातावरणात निरोपासाठी सर्व जण सज्ज झाले आहेत. तयारी अगदी अंतिम टप्प्यात असते .आपण सगळ्यांचे आराध्य दैवत असलेल्या बप्पाची आपण श्री.गणेश, गणपती, विघ्नहर्ता अशा अनेक नावाने आपण स्मरण करतो .आपल्या सर्वांच्या लाडक्या बाप्पाचा गणेशोत्सव हा सर्व गणेशभक्त मोठ्या आनंदाने साजरा करत असतात. गणपती बाप्पा यांचं महत्व आणि महती खुप महान आहे .श्री गणेशाला प्रत्येक पुजेमध्ये अग्रपुजेचा मान का मिळाला? त्याच बरोबर बप्पा कोण आहेत. प्रत्येक गावात एक तरी गणपतीचे मंदिर असतेच, कोणताही माणुस दिवसाची सुरुवात गणपतीचे दर्शन करुनच करतो .या मध्ये आपल्या धर्मशास्त्रा नुसार गणपती बाप्पा हे माता पार्वतीने स्वतःच्या मळापासून तयार केलेला पार्वतीपुत्र आहेत . ज्यानी स्वतःची आई पार्वती ही स्नान करत आहे तीचे स्नान होईपर्यंत कोणालाही प्रवेश देऊ नये हा आईचा आदेश पालन करण्यासाठी जगाचे संहारक श्री भगवान शंकर यांच्या सोबत युद्ध केले. खुद्द महादेव यांना देखील पराभूत केले होते. परंतू शेवटी भगवान शंकर यांनी क्रोरधित होऊन त्रिशुळाने श्रीगणेशाचा शिरच्छेद केल्यानंतर हि वार्ता माता पार्वतीला समजली तेंव्हा माता पार्वतीने भगवान शंकर यांच्या कडे हट्ट केला .कि श्री गणेशाला पुन्हा सजीव करा त्यावेळी भगवान शंकर यांनी आपल्या त्रिशुळाने हत्तीचे मस्तक शिरच्छेद करून श्रीगणेशाला लावले व श्रीगणेशाचा गजवक्र गणपती झाले.गणपती हे देवता मधील महत्वपूर्ण पद यावर गणेश यांना विराजमान केले.आई पर्वती यांच्या अज्ञेनुसार पृथ्वीप्रदक्षणा करण्याच्या वेळी गणपतीने ही स्पर्धा पार्वतीला प्रदक्षणा करुन जिंकली व सिद्ध केले की पार्वती म्हणजे आपली आई हीच आपली माता तिची प्रदक्षणा केली. म्हणजे पृथ्वी प्रदक्षिणा घडली पुर्ण झाली. त्यावेळी सगळ्या देवांनी गणेशाला म्हटले की गणेशा माग काय मागतोस



ते तेंव्हा गणेशाने मागितले की कोणत्याही पुजेला मला सर्वात आधी मान दिला जावा म्हणून कोणत्याही पुजेची सुरुवात श्री. गणेशाय नमः अशा मंत्रोच्चराने होते.

गणपती बप्पा हे सरस्वती आणि लक्ष्मी म्हणजे विद्या आणि धन या दोघांचाही भाऊ आहे. गणपतीचा जो भक्त म्हंटला गेला त्याजवळ धन आणि बुद्धी दोन्हीचाही संयम राखल्या जातो. त्यामुळे गणेशाची उपासना कधीच व्यर्थ जात नाही. आपल्या धर्म शास्त्रानुसार गणेशाचं महत्व अनन्यसाधारण आहे. गणपतीला, गणपती, श्रीगणेश या प्रसिद्ध दोन नावांशिवाय अन्य अशी 106 नावे आहेत . त्यामध्ये लंबोदर, महाबल, महागणपति, महेश्वर, मंगलमूर्ति, गजकर्ण, गजानन, गजवक्र, गणाध्यक्ष, गणपती ,गौरीसुत - लंबकर्ण ,विघ्नराज, विघ्नराजेन्द्र, विघ्नविनाशाय , विघ्नेश्वर , विकट, धार्मिक , दूर्जा, द्वैमातुर, एकदंष्ट्र, ईशानपुत्र, गदाधर, कपिल, कवीश, श्वेता , सिद्धिप्रिय, स्कंदपूर्वज , भालचन्द्र, बुद्धिनाथ, धूम्रवर्ण, एकाक्षर, एकदंत, मूषकवाहन, बालगणपति, बुद्धिप्रिय, बुद्धिविधाता, चतुर्भुज, देवदेव, देवांतकनाशकारी, गणाध्यक्षिण, गुणिन, हरिद्र, हेरंब,निदीश्वरम , प्रथमेश्वर, शूपकर्ण, शुभम , सिद्धिदाता, मूढ़ाकरम, मुक्तिदायी, नादप्रतिष्ठित, नमस्तेतु, उमापुत्र, वरगणपति, वरप्रद, वरदविनायक, वीरगणपति, विद्यावारिधि, विघ्नहर, विघ्नहर्ता, विनायक, विश्वमुख, यज्ञकाय, यशस्कर, यशस्विन, योगाधिप, सिद्धिविनायक, सुरेश्वरम, वक्रतुंड, अखूरथ अलंपत, अमित, अनंतचिदरुपम, अवनीश, अविघ्न ,भीम, भूपति, भुवनपति, देवव्रत, देवेन्द्राशिक , विघ्नविनाशन, सुमुख, स्वरुप, तरुण, उद्दण्ड ,कीर्ति, कृपाकर, कृष्णपिंगाक्ष, क्षेमंकरी, क्षिप्रा, मनोमय, मृत्युंजय, नंदन,पाषिण,पीतांबर, प्रमोद, पुरुष, रक्त, रुद्रप्रिय, सर्वदेवात्मन, सर्वसिद्धांत , सर्वात्मन, शांभवी, शशिवर्णम, शुभगुणकानन. ही सर्व नावे आपल्या लाडक्या गणरायाची आहे. यतो बुद्धिरज्ञाननाशो मुमुक्षोः, यतः सम्पदो भक्तसन्तोषिकाः स्युः।यतो विघ्ननाशो यतः कार्यसिद्धिः, सदा तं गणेशं नमामो भजामः॥ हा मंत्र गणेशाचे नामस्मरणः करण्यासाठी सातत्याने जपला जातो. दरवर्षी गणपतीचा उत्सव आपण सगळ्यांना लळा लावून जातो. सध्या सर्वत्र गणेशोत्सव चालू आहे .आनंदाची सगळी कडे धामधूम सुरू आहे . आणि या सगळ्यात आता गणपती बाप्पा यांना पुढील वर्षाच्या निमंत्रणासह निरोपासाठी भक्तगण सज्ज आहेत आणि प्रत्येक जण निरोप समारंभाच्या आनंदात तलिन होण्यासाठी आतुर आहे. सगळीकडे एकच धामधुम आहे. गणपती बप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या आणि अशा आकाश भेदी गर्जना देत भक्त बाप्पांना निरोप देतात आणि पुढील वर्षाच्या अगमनाच निमंत्रण देतात. सर्व गणेश भक्तांना अनंत चतुदर्शीच्या निमित्ताने हार्दिक शुभेच्छा!

# बंद पथदिवे शोभेची वस्तू पण किती दिवस ?




संगीता ठलाल
७८२१८१६४८५

आधुनिक केसरी

**जेथे घर आहे तेथे उजेड असावा, जेथे गाव आहे त्या गावात उजेड असावा पण, ज्या गावात पथदिवे लावलेले असून सुद्धा ते नेहमीच बंद राहत असतील तर त्या गावात राहणाऱ्या लोकांनी अंधारात राहून किती दिवस काढावे...? म्हणजेच त्यांच्या जीवनातील हि एक प्रकारची नवीन समस्या निर्माण झाली म्हणायला काहीच हरकत नाही तसेही ते, अनेक अडी, अडचणींचा सामना नेहमीच करत असतात तशीच पुन्हा हि एक प्रकारची नवीन अडचण त्यांच्या जीवनात बघायला मिळत असते. ह्या अशा अडचणींचा सुद्धा त्यांना नेहमीच सामाना करावे लागते बऱ्याच गावामध्ये पथदिवे लावलेले असतात पण ते नेहमीच बंद असलेले दिसून येतात. सध्याच्या घडीला सण, उत्सवाचे दिवस सुरू आहेत तरीही सुद्धा काही गावात अजूनही अंधार आहे .**

मग त्यांच्या जीवनात उजेड कधी यावा हा सुद्धा एक महत्वाचा प्रश्न आहे. बरेचदा वृतपत्राच्या माध्यमातून गावखेड्यात बंद असलेले पथदिवे या विषयी बातम्या वाचायला मिळत असतात हे, कोणापासूनही लपलेले नाही, तरीही सुद्धा त्याकडे काळजीपूर्वक लक्ष दिले जात नाही. म्हणून लावलेले बंद पथदिवे आज शोभेची वस्तू बणताना दिसत आहेत. सोबत शेतीला ही वीजपुरवठा पूर्णपणे मिळत नाही, घरगुती वीज पुरवठा सुध्दा कमी मिळत असते, पण विजेचा बिल मात्र गगणाला जाऊन भिडलेला दिसून येतो या प्रकारची अडचण पाहून गोरगरीबांनी काय करावे...? बंद पथदिवे असलेल्या गावामध्ये जर अंधारच राहत असेल तर त्या गावाचा पूर्णपणे विकास झाला म्हणता येणार नाही कारण, बंद पथदिवे असतांना पाहून त्यातून नको त्या घटना घडू शकतात, काही प्रसंग न कळताच येऊ शकतात तसेच वनप्राण्यांची वाटचाल आजकाल गावाकडे होतांना दिसत आहे. कधी, काळी सांगता येत नाही की,वनप्राणी अंधाराचा फायदा घेऊन रात्रभर गावात राहिले आणि नुकसान करून निघून गेले तरी कोणालाही कळणार नाही. याच अंधाराचा फायदा घेऊन काहीही होऊ शकते. त्याच प्रमाणे समाजात एक प्रचलित म्हण आहे ती,म्हणजेच ज्याचं जळतं त्यानाचं कळतं व सहनही त्यांनाच करावे लागते मग अशा शोभेची वस्तू बणलेल्या बंद पथदिव्यांचा काय उपयोग. ..? जर ते पथदिवे उपयोगी पडत नसतील तर त्यांनी उजेडाची प्रतिक्षा कोणाकडून करावे . .? गावात राहणारे लोक अशा अनेक अडचणींना नेहमीच सामना करत असतात.बंद पथदिव्यामुळे संपूर्ण गावाला त्रास सहन करावा लागतो तरीही त्यांना होणारा त्रास व अडचणी कोणालाही दिसत नाही. त्यामुळे अनेक जण ह्या होणाऱ्या त्रासाला वैतागुन गेले आहेत. नेहमीच बंद असलेले पथदिवे हि एक प्रकारची चिंताजनक बाब आहे ज्या प्रमाणे उभारलेले मोठे,मोठे टॉवर असतात पण,नेटवर्क नेहमी बंद असते त्याप्रमाणेच हे, बंद असलेले पथदिवे शेवटी शोभेची वस्तू बणत आहेत. आज ह्या बंद पथदिव्यांमुळे वाढत असलेल्या अडचणी संकटांना आमंत्रण देत आहेत. म्हणून असे पुढे होऊ नये यासाठी बंद असलेले पथदिवे सुरु होणे काळाची गरज आहे व तेथे राहणाऱ्या लोकांना ह्या त्रासापासून सुटका होण्यासाठी व त्यांच्या मनात इतर गोष्टींविषयी जी भीती निर्माण झालेली बघायला मिळत आहे ती, भीती दूर घालविण्यासाठी त्वरीत बंद पथदिवे सुरु करावे. कारण गावातही माणसेच राहतात ज्याप्रमाणे शहरात माणसे राहतात, शहरात जिकडे, तिकडे उजेडाची सोय दिसत असते तशीच सोय गावात सुद्धा होणे गरजेचे आहे. बंद असलेले पथदिवे सुरु करून पुन्हा एकदा गावात उजेड आणण्यासाठी प्रयत्न करावे कारण गावातील लोक आजही उजेडाच्या प्रतीक्षेत वाट बघत आहेत.



# लोककल्याणकारी क्रांतिकारक संत तुकाराम महाराज

आधुनिक केसरी

सनातन्यांच्या वर्चस्वातून समाज मुक्त व्हावा, या हेतूने संत तुकारामांनी ब्राह्मणी व्यवस्थेवर कडाडून हल्ला केला.

**ऐसें कैसे झाले भोंदू। कर्म करुनि म्हणती साधू।।अंगा लावुनिया राख। डोळे झाकुनि करिती पाप।। दावी वैराग्याची कळा। भोगी विषयांचा सोहळा।। तुका म्हणे सांगो किती ।जळो तयांची संगती।। भटाची संगत सोडा हे** संत तुकाराम महाराजानी निक्षून सांगितले. त्यांनी यज्ञ, होम, हवन, तीर्थयात्रा, व्रतवैकल्ये, दशक्रिया, पुरोहितगिरी, पंचांग, भविष्य याविरुद्ध मोहीमच उघडली, त्यामुळे सनातनी वर्ग संत तुकाराम महाराजांच्या विरोधात उभा राहिला. त्यांच्या अभंगांची गाथा सनातन्यांनी इंद्रायणीत बुडवली. ते पदोपदी संत तुकाराम महाराजाना त्रास देऊ लागले आणि यातच संत तुकाराम महाराज नाहीसे झाले.

ब्राह्मणी पक्षाच्या मतानुसार ते वैकुंठाला गेले, तर अभ्यासक सुदाम सावरकर आणि संस्कृतपंडित डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या मतानुसार त्यांचा घातपात झालेला आहे. दोन्ही पक्षाचे मत पाहण्यापूर्वी संत तुकाराम महाराज यांचे वैकुंठ, स्वर्ग याबाबत काय मत होते,ते आपण पाहू. संत तुकाराम महाराज हे जीवनाला कंटाळलेले नव्हते. ते जगू आणि लढू इच्छिणारे हिम्मतवान आणि क्रान्तीकारक संत होते. ते म्हणतात

**बुडता हे जन न देखवे डोळा।**
**येतो कळवळा म्हणोनिया।**

जनतेला ब्राह्मणी गुलामगिरीतून बाहेर काढणे हे त्यांचे जीवितकार्य होते. त्यामुळे ते जबाबदारी सोडून इहलोक सोडून जाणारे नव्हते. ते उपास-तापास जप-जाप्य करणारे नव्हते.

**नको सेवू वन। नको सांडू अन्न।**

अन्नत्याग करणे आणि वनांत जाणे, याला संत तुकाराम महाराजानी विरोध केला.

संत तुकाराम महाराजानी स्वतः स्वर्ग, वैकुंठ, मोक्ष नाकारलेला आहे. ते म्हणतात

**येथे मिळतो दहिभात।**
**वैकुंठी त्याची नाही मात।**

पृथ्वीवर काबाडकष्ट केले तर दहीभात-भाजीभाकरी तर मिळेल, पण वैकुंठात जे कामधेनू, कल्पवृक्ष, चिंतामणी सांगितले जातात ते धादांत खोटं आहे.ते म्हणतात

**भय नाही जन्म घेता।मोक्षपदा हाणो लाथा।**
**तुका म्हणे आता। मज न लगे सायुज्यता।**

संत तुकाराम महाराज म्हणतात "या जन्माची मला भीती नाही, म्हणजे ते पृथ्वीवर राहू इच्छित होते, मोक्षाला लाथा घाला" असे म्हणून ते मोक्ष( वैकुंठ ) नाकारतात. जे तुकाराम महाराज वैकुंठ नाकारतात, ते तुकाराम महाराज वैकुंठाला जातील का ?. तथाकथित मोक्षाचे अतिउच्च पद म्हणजे सायुज्यपद आहे, असे वैदिक परंपरा सांगते, त्या सायुज्यपदाला तुकाराम महाराज नाकारतात. म्हणजे जे तुकाराम महाराज वैकुंठ नाकारतात, ते तुकाराम महाराज वैकुंठाला जातील का ?. तुकाराम महाराज म्हणजे

**बोले तैसा चाले। याची वंदावी पाऊले।**

या विचारांचे जसे बोलायचे तसे वागायचे, असे होते. म्हणजे तुकाराम महाराज वैकुंठाला गेले नाहीत, हे त्यांच्याच अभंगावरून/विचारावरून स्पष्ट होते. मग तुकाराम महाराजांचा वयाच्या 42 व्या इतक्या तरुण वयात मृत्यू कसा झाला ? संत तुकाराम महाराजांचा लढा सनातनी व्यवस्थेविरुद्ध होता. त्यांनी तुकाराम महाराजाना खूप त्रास दिला होता. तुकाराम महाराज विचाराने लढत होते, तर, सनातनी त्यांच्याविरुद्ध कटकारस्थान करत होते. त्यांच्या अभंग लेखनावर बंदी घालणे, त्यांचे अभंग इंद्रायणीत बुडवणे, त्यांची बदनामी करणे, या बाबी सनातन्यांनी संत तुकाराम महाराजांची घातपात करून ते विमानात बसून वैकुंठाला गेले, अशी अफवा पसरवली. अफवा पसरवण्यात सनातन्यांचा हात जगात कोणीही धरणार नाहीत.

सर्वात महत्वाचे -संत तुकाराम महाराजांनाच विमान न्यायला आले, तर मग आद्य शंकराचार्य, संत एकनाथ, रामदास यांना न्यायला विमान का आले नाही ?. 17 व्या शतकात वैकुंठाला नेणारे सोडाच, पण चंद्रावर घेऊन जाणारे तर विमान भारतात होते का ? वैकुंठाला खोटं ठरवणारे संत तुकाराम महाराजच वैकुंठाला गेले, असा प्रचार करणे, ही बाबच त्यांचा शेवट कसा झाला, हे स्पष्ट करते.

# बारवांचे संवर्धन करण्याची गरज : राजे राजेंद्र जाधवराव देशमुख

## ऐतिहासिक ठेवींचे संवर्धन पुरातत्व तसेच तीर्थक्षेत्र विभागाने लक्ष देण्याची गरज

आधुनिक केसरी न्यूज



**घनसावंगी :** शहरामध्ये निजाम व निजामपूर्व काळातील पुरातन बारव असून, त्या बारवाचे संवर्धन करण्याची गरज आहे. त्यासाठी शासनाने व लोकप्रतिनिधी यांनी लक्ष देऊन निधी उपलब्ध करावा, अशी मागणी घनसावंगी येथील मा नगराध्यक्ष राजेराजेंद्र जाधवराव देशमुख यांनी केली आहे. घनसावंगी शहर हे अत्यंत ऐतिहासिक शहर असून, या ठिकाणी नृसिंह मंदिर, रेणुकादेवी तुकाई देवी मंदीर, शहानवाज कलंदर दर्गा, महादेव मंदिर, बालाजी मंदिर, खंडोबा मंदिर आदींसह विविध धार्मिक व समाधीस्थळे असून सर्व धार्मिक स्थळाला दिवाबत्ती, उत्सव आणि झाडझुड इत्यादी कारणासाठी इनामी जमिनी देखील आहेत. सिंदखेडराजा येथील राजे लखोजीराव जाधवराव यांच्या वंशज शाखेतील राजश्री निळकंठराव जाधवराव यांचे वंशज देखील घनसावंगी शहरांमध्ये राहतात. येथे राजे जाधवराव घराण्याची ऐतिहासिक गडी देखील होती, तसेच थोरले छत्रपती शाहू महाराज यांच्या निकटवर्ती असलेले राजश्री नीलकंठराव जाधवराव यांना पाठभावातील कहलामुळे घनसांगवी येथील देशमुखी व पाटीलकी च्या वतनावर पाठवल्याचे इसवी सन 1733 सालचे ऐतिहासिक पत्र देखील उपलब्ध आहे तसेच राजश्री नीलकंठराव यांना निजामाने कैद केल्यानंतर त्यांची सुटका करण्यासंबंधित छत्रपती थोरले शाहू महाराज यांच्या आज्ञेचे पत्र देखील उपलब्ध आहे. तसेच छत्रपती थोरले शाहू महाराज यांचे निकटवर्ती असलेले सरदार राजश्री नीलकंठ जाधवराव यांच्या संबंधित अनेक ऐतिहासिक पत्रे महाराष्ट्र शासनाकडील पुराभिलेख कार्यालयात उपलब्ध आहेत अनेक बाबीने घनसावंगी शहर ऐतिहासिक आहे. या संबंधित संदर्भातसहित पुरावेदेखील उपलब्ध आहेत. या ऐतिहासिक ठेवींचे संवर्धन शासनाच्या पुरातत्व तसेच तीर्थक्षेत्र विभागाने लोकप्रतिनिधी यांनी लक्ष देण्याची गरज असल्याची अपेक्षा मा. नगराध्यक्ष जाधवराव देशमुख यांनी व्यक्त केली आहे.







# सद्यस्थितीत उसाचे गाळप करण्यासाठी कारखाना सज्ज : डॉ. हिकमत उढाण

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** अंबड तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी उभारलेल्या ब्लू सफायर फुड प्रोसेसिंग ली. कंडारी या बहु प्रतिक्षित कारखान्याचा प्रथम अग्नी प्रदिपण समारंभ दिनांक 26 सप्टेंबर 2023 रोजी कारखान्याचे संस्थापक डॉ. हिकमत उढाण आणि सौ. डॉ. मायाताई हिकमत उढाण यांच्या हस्ते पार पडला.उसाचा पट्टा म्हणून ओळख असलेल्या अंबड घनसावंगी तालुक्यात 3 साखर कारखाने असून देखील शेतकऱ्यांची होरपळ थांबत नव्हती. ऊसाचे राजकारण करत येथील राजकीय मंडळी वैयक्तिक राजकारणाच्या उच्च शिखरावर पोहचली परंतु शेतकऱ्यांची होरपळ आणि परवड संपली नाही. उसाच्या नावाखाली शेतकऱ्यांचा मानसिक आणि आर्थिक छळ येथील राजकारणी मागील 35 वर्षापासून करत राहिली. शेतकऱ्यांची विविध मार्गांनी अडवणूक करत शेतकऱ्यांना मरण यातना या प्रस्थापित कारखानदारांनी आपल्या यंत्रणेच्या माध्यमातून देत विकासाच्या नावाखाली "हम करेसो कायदा" या उक्तीप्रमाणे वागत राहिले. उसाच्या रीतसर नोंदी घेवून शेवटी उरलेल्या उसाला अतिरिक्त ऊस असे अनधिकृत नाव देत या कारखानदारांनी शेतकऱ्यांना अक्षरशः जेरीस आणले. या कारखान्याच्या निमित्ताने तालुक्यातील गरीब, सर्व साधारण, फार पोहच नसलेल्या शेतकऱ्यांच्या आणि विशेषतः अनेक दिवसापासून छळ सहन करत असलेल्या जिवाभावाच्या शिवसैनिक शेतकऱ्यांच्या उसाचा प्रश्न या कारखान्यामुळे कायमचा मिटणार आहे. अनेक राजकीय टीका टिप्पणीकडे दुर्लक्ष करत दादांना केवळ आपल्या कामावर लक्ष केंद्रित केल्याने त्यांना शांत डोक्याचा आणि संस्कारित नेता म्हणून तालुक्यात ओळखले जात आहे. उघड नसला तरी उढाण यांना मिळणारा जनतेचा छुपा पाठिंबा हा विरोधकांच्या चिंतेचा विषय बनला आहे. या एकाच कारखान्यांवर न थांबता काही दिवसातच दुसऱ्या प्रस्तावित कारखान्याचे सुद्धा काम हाती घेतले जाणार असल्याचे डॉ. उढाण यांनी सांगितले. त्यापुढे देखील त्यांच्या विविध योजना तालुक्यातील जनतेसाठी येणार असल्याचे निश्चित आहे. अतिशय हुशार, अभ्यासू, अनुभवी, समृध्द - सर्व गुणसंपन्न, गल्ली ते दिल्ली पर्यंत पोहच असणारे, धाडसी, निडर आणि धोरणात्मक काम करणारे त्याचसोबत अत्यंत प्रेमळ मनाचे, घनसावंगीचे भूमिपुत्र असलेले डॉ. हिकमत उढाण हे आपल्यात असणे म्हणजे जनतेचे परम भाग्यच म्हणावे लागेल. यावेळी जनरल मॅनेजर संजय तुरे पाटील, चिफ अंकौन्टट जयंत कुलकर्णी, चीफ केमिस्ट्री मारुती सातगिरे, मुख्य शेतकी अधिकारी विलास डाके शेतकरी बांधव पदाधिकारी आदींची उपस्थिती होती.

# अ.भा. मराठा महासंघाची वार्षिक सभा व मेळावा ३० सप्टेंबर रोजी शिर्डी येथे होणार

आधुनिक केसरी न्यूज







**शिर्डी :** अखिल भारतीय मराठा महासंघाची वार्षिक सर्वसाधारण सभा, युवा उद्योजक, शेतकरी व विद्यार्थ्यांकरिता मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन शनिवार, दि. ३० सप्टेंबर रोजी शिर्डी येथे करण्यात आले असून या मेळावा आयोजित केला आहे अशी माहिती राष्ट्रीय सरचिटणीस प्रकाश देशमुख यांनी दिली आहे.
अखिल भारतीय मराठा महासंघाचे २०२३ ची वार्षिक सर्वसाधारण सभेच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र कोंढरे तर मेळाव्यासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ना. नरेंद्र पाटील हे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमसाठी उपाध्यक्ष विनायक पवार, वसंतराव मुळीक, राष्ट्रीय खजिनदार प्रमोद जाधव, राष्ट्रीय चिटणीस गुलाब गायकवाड, युवा प्रतिनिधी आतिष गायकवाड, महिला प्रतिनिधी भारती पाटील यांच्यासह विभागीय पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. या सभेसाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ व सारथी संस्थेच्या विविध योजनांचा युवा उद्योजक, शेतकरी व विद्यार्थी मार्गदर्शन मेळावा होईल. तसेच जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील मान्यवरांचा मराठा भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात येईल तसेच नवीन पदाधिकारी यांना नियुक्ती पत्र देण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने मराठा समाजातील युवा उद्योजक, शेतकरी, विद्यार्थी व महिला भगिणींनी उपस्थित राहण्याचे आवाहन लालूशेठ दळवी, उत्तर जिल्हाध्यक्ष प्रकाश निर्मळ, दक्षिण जिल्हाध्यक्ष शिवाजी डौले, सरचिटणीस रमेश बोरूडे, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख भाऊसाहेब वाकचौरे आदींसह जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# सोयगाव येथे औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या वतीने गड किल्ले स्वच्छता अभियान

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था विभाग व गडकिल्ले संवर्धन समिती गडकिल्ले स्वच्छता अभियानाअंतर्गत समिती व यांच्या वतीने राबविण्यात आलेल्या 'महा'स्वच्छता अभियानाला दि.२/१०/२३ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्याभिषेक वर्षा निमित्त सोहळाचा औचित्य साधून साफसफाई व स्वच्छता करण्यात येणार आहे तशी परवानगी पुरातत्त्व विभाग छत्रपती संभाजीनगर यांच्या कडून मिळाली आहे.
यामध्ये सर्व कर्मचारी व प्रशिक्षणर्थी उत्स्फूर्त सहभाग नोंदविणार आहेत तरी स्वयंसेवी संस्था आवाहन या संस्थेचे प्राचार्य मस्के यांनी केले आहे. महाराष्ट्राच्या पर्यटनाची शान असलेल्या ऐतिहासिक अजिंठा लेणी, किल्ले पुरातत्व विभाग व गडकिल्ले संवर्धन समितीच्यावतीने सोयगाव पहिलीच स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे.संस्थांनी स्वागतार्ह सहभाग दर्शविला.सोयगावातील गडकिल्ले स्वच्छतेतून संवर्धनाचा संदेश या अभियानातून देण्यात येणार आहे.
संयुक्त स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यात सोयगाव बाहेरील संस्था तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.
मोहिमेत प्लास्टिक बाटल्या, वेष्टने, पिशव्या यासह किल्ल्यातील गोड्या पाण्याच्या विहिरी, मंदिरे, महाराजांच्या हाताचे व पायांचे ठसे, चुना तयार करण्याची जागा आदी ठिकाणी वाढलेली झाडी-झुडपे प्रामुख्याने हटविण्यात येणार आहे.
मस्के यांनी स्वच्छतेचे महत्त्व विषद करून उपस्थित शिवप्रेमींना स्वच्छता कामाची विभागणी करून देण्यात येणार आहे.सोयगावतील गडकिल्ले स्वच्छतेतून संवर्धनाचा संदेश या अभियानातून देण्यात येणार असल्याची माहिती म्हस्के यांनी बोलताना सांगितले.




# चंद्रशेखर बावनकुळे यांचा पैठण तालुका मराठी पत्रकार संघटनेच्या वतीने निषेध

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्रकाराबद्दल वापरलेल्या अपशब्दाचा पैठण मराठी पत्रकार संघटनेच्या वतीने जाहीर निषेध करण्यात आला.
तसेच पत्रकारांना चाय बिस्कुट पत्रकार अशी उपमा देऊन अवमान करणाऱ्या बावनकुळे यांचा पैठण तालुका मराठी पत्रकार संघटनेच्या वतीने बुधवार दिनांक २७ सप्टेंबर रोजी बस स्थानक चौकात जाहीर निषेध करत आंदोलन केले.
यावेळी सर्व पत्रकारांनी बावनकुळे यांच्या विरोधात तीव्र घोषणा देत परिसर दणाणून सोडला. पुढील वर्षी निवडणुका होणार असून भाजपच्या विरोधात पत्रकारांनी बातमी छापू नये म्हणून पत्रकारांना चहापाणी करा, धाब्यावर घेऊन जा, वाटल्यास मद्यपानही करा अशा प्रकारचे वक्तव्य बावनकुळे यांनी केले होते. यावेळी तालुका अध्यक्ष रमेश लिंबोरे यांच्या नेतृत्वाखाली व ज्येष्ठ पत्रकार संजय जाधव, चंद्रकांत तारू यांच्या प्रमुख उपस्थितीत गौतम बनकर, रमेश शेळके, नंदकुमार चव्हाण, शिवाजी गाडे, मदन आव्हाड, दादा घोडके, सुरेश वायभट, बद्रीनाथ खंडागळे ,मनोज खुटेकर, दादासाहेब गलांडे, राहुल पगारे, ज्ञानेश्वर बावणे, एकनाथ काळे, मोहन ठाकुर, गजानन आवारे, गणेश सकुंडे, विनोद लोहिया सह अनेक पत्रकार आंदोलनात सहभागी झाले होते.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# श्रामणेर प्रशिक्षण केंद्र धम्मचळवळीत अग्रेसर

## जिल्हाधिकारी डॉ. अभिजित राऊत यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेल्या धम्मचळवळीला गतिमान ठेवण्यासाठी श्रामणेर प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून भदंत पंय्याबोधी थेरो आणि भिक्खू संघाचे कार्य वाखाणण्याजोगे आहे. या ठिकाणी धम्मसंस्कारांबरोबरच सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, अंधश्रद्धा निर्मूलन, वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन, भोजनदान असे विविध उपक्रम राबविले जातात. यामुळे हे श्रामणेर प्रशिक्षण केंद्र धम्मचळवळीत अग्रेसर बनले आहे असे प्रतिपादन येथील जिल्हाधिकारी डॉ. अभिजित राऊत यांनी केले. ते तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रास भेट दिली असता माध्यमांशी बोलत होते. यावेळी अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष तथा धम्मगुरू संघनायक भदंत पंय्याबोधी थेरो आणि भिक्खू संघासह आंबेडकरवादी मिशनचे प्रमुख दीपक कदम,



वंचितचे प्रशांत इंगोले, अभियंता भरतकुमार कानिंदे, प्रा. साहेबराव इंगोले, स्टेशन प्रबंधक देविदास भिसे, टी. पी. वाघमारे, प्रा. विनायक लोणे, प्रभू सावंत, प्रा. अविनाश नाईक, आप्पाराव नरवाडे, नागोराव नरवाडे आदींची उपस्थिती होती. याप्रसंगी जिल्हाधिकारी महोदयांच्या हस्ते प्रशिक्षण केंद्राच्या गाडी पार्किंग परिसरात बोधीवृक्षाचे वृक्षारोपण करण्यात आले.

जिल्हाधिकारी डॉ. अभिजित राऊत यांनी आपल्या अत्यंत व्यस्तेतून तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रातील कार्याचा व परिसराचा आढावा घेण्यासाठी वेळ देऊन पाहणी केली. तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुष्प पूजन करून अभिवादन केले. यावेळी बोलतांना आंबेडकरवादी मिशनचे प्रमुख दीपक कदम म्हणाले की, श्रामणेरांकरिता महाराष्ट्रातील अत्यंत महत्त्वाचे आणि आधुनिक केंद्र या ठिकाणी निर्माण झाले आहे. पालक साधन देऊ शकतात पण संस्कार देऊ शकत नाहीत. परंतु श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात या दोन्ही बाबी मिळतात ही एकमेव अद्वितीय घटना आहे असे मत कदम यांनी व्यक्त केले. अकरा फुटांची अखंड पाषाणात कोरलेली संगमरवरी दगडातील बुद्धमूर्ती प्रतिष्ठापित करण्याच्या प्रस्तावित धम्मसंकल्प भवनाचे भूमिपूजनही यावेळी दिपक कदम यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी उपप्राचार्य साहेबराव इंगोले आणि भदंत पंय्याबोधी थेरो यांनी मनोगत व्यक्त केले.

# जीव मुठीत धरून पाण्यातून विद्यार्थ्यांचा प्रवास!

आधुनिक केसरी न्यूज

**गोंदिया :** देवरी तालुक्यातील कन्हाळगाव या मुख्य मार्गावरून असलेल्या नाल्यावरील पुलाची उंची कमी असल्याने दरवर्षी थोडाफार पाऊस पडला की पुलाला पूर येतो. यामुळे प्रवाश्यांसह विद्यार्थ्यांना जीव मुठीत घेवून पुराच्या पाण्यातून प्रवास करावा लागतो.
तीन दिवसापूर्वी आलेल्या पावसामुळे पुन्हा पूर आला. मात्र, या संदर्भात एकही जनप्रतिनिधी तसेच प्रशासन लक्ष देत नसल्याने केव्हाही एखादी अप्रिय घटना घडू शकते.
संबंधित विभागाने पुलाचे बांधकाम करून उंची वाढविण्यात यावी, अशी मागणी केली येथील रहिवाशांकडून केली जात आहे. उल्लेखनीय असे की, पूरामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.
देवरी तालुक्यातील कन्हाळगाव मुख्य रस्ता देवरी शहराला जोडण्यात आला असून, या मुख्य रस्त्यावर कन्हाळगाव, बोवाटोला, जुगरूटोला, सिरजारटोला, मुरमाडीटोला, मंगेझरी असे अनेक छोटे छोटे खेडेगाव जोडले आहेत. या रस्त्यावरून अनेक नागरिक तसेच विद्यार्थी ये जा करीत असतात. या मुख्य रस्त्यावर लहान लहान नाले वाहत असून, या नाल्यांवर पुल बांधलेले आहेत. उन्हाळा तसेच हिवाळ्यात कन्हाळगाव मुख्य मार्ग आवागमनासाठी, काहीही अडचणी येत नाही.

# सकल मराठा बांधवांचा आक्रोश ऐकून आ. राजेश पवारांनी कार्यक्रमाकडे पाठ

## आ. राजेश पवारांविरोधात अश्लील घोषणाबाजी

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** मराठा समाजाला आरक्षण मिळेपर्यंत मराठा नेत्यांचे कार्यक्रम व गाव प्रवेश बंद अशी आक्रमक भुमिका धर्माबादेत सकल मराठा बांधवांनी केली असल्याने या धास्तीने धर्माबादेत मंगळवारी होणारा कार्यक्रमला आमदार राजेश पवार यांनी येण्याचे रद्द केले आहे. येथील प्रशासकीयांनी चुटुर बुटुर कार्यक्रम घेऊन मोकळे झाले. पण धर्माबादेत सकल मराठा बांधवांचा आक्रोश ऐकून आमदार राजेश पवारांनी कार्यक्रमाला फिरवली पाठ अशी चर्चा रंगत आहे. धर्माबादेत प्रशासाकीय तर्फे आयुष्यमान कार्ड व आभा कार्ड शिबिराचे उदघाटन आमदार राजेश पवार यांच्या हस्ते दि.२६ सप्टेंबर २०२३ रोजी जिल्हा परिषद हायस्कूल मध्ये आयोजन केले होते.हे धर्माबाद सकल मराठा बांधवांना चार दिवशा पुर्वी च समजले होते. कार्यक्रम होऊ देयाचा नाही, आमदार राजेश पवार आले तर विरोध करायचा,त्याचा निषेध करायचा, मराठा समाजाला आरक्षण मिळे पर्यंत राजकीय मराठा पुढाऱ्यांना गाव बंदी करायचे, अशी संकल्प सकल मराठा बांधवांनी घेतले. आमदार राजेश पवार धर्माबादला येत आहेत, असे समजल्याने, होत असलेल्या कार्यक्रम समोर सकल मराठा आक्रमक होऊन निषेध करण्यासाठी काळ्या पट्ट्या डोक्याला बांधुन आमदार राजेश पवार यांच्या विरोधात घोषणा दिले. एक मराठा लाख मराठा,दुरी तीरी एक्का, राजेश पवार छक्का व राज्य सरकारच्या विरोधात घोषणा सकल मराठा यांनी दिले. हे वातावरण समजल्याने आमदार राजेश पवार यांनी आलेच नाहीत.राजेश पवार येत नसल्याचे समजल्याने सकल मराठा बांधवांनी कार्यक्रमाचे काढण्यात आलेले बॅनरवरील आमदार राजेश पवार याच नाव फाडून टाकले.नं तर हे वातावरण पाहून प्रशासकीयाचा हिरमोड झाला.येणारे प्रमुख पाहुणे कोणी आले नाही.कसे बसे कार्यक्रम घेऊन प्रशासाकीय मोकळे झाले.एकदरीत सकल मराठा बांधवांनी आमदार राजेश पवार यांचा कार्यक्रम धुडकावून लावले अशी चर्चा रंगत आहे. पुढेही एकाही मराठा राजकीय पुढाऱ्यांचा कार्यक्रम होऊ देणार नाही असे आवाहन केले आहे.माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण हे धर्माबादेत आले असता सकल मराठा बांधवांनी निषेध केला होता. तेव्हापासुन महाराष्ट्रात राजकीय पुढाऱ्यांना बाहेर फिरणे मुश्किल झाले आणि धास्ती निर्माण झाली आहे. या धास्तीने धर्माबादेत खासदार चिकलीकर यांचे होणारे कार्यक्रम ही रद्द झाले.



# श्रीमती पठाण समिना आदर्श मुख्याध्यापक; तर आदर्श शिक्षक म्हणून सिराजुल हसन यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** महाराष्ट्र राज्य उर्दु शिक्षक संघटना लातूर तर्फे मराठवाडा स्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार वितरणाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.
यावेळी जिंतूर तालुक्यातून प्राथमिक गटातून श्रीमती पठाण समिना यास्मिन करामत खान यांची आदर्श मुख्याध्यापक तर माध्यमिक गटातून मोहम्मद सिराजुल हसन यांची आदर्श शिक्षक म्हणून निवड करण्यात आली.
यावेळी शिक्षक आमदार श्री विक्रम काळे साहेब, महाराष्ट्र राज्य उर्दु शिक्षक संघटना चे राज्य अध्यक्ष एम. ए. गफ्फार, राज्य अध्यक्ष श्री युनुस अन्सारी आदी मान्यवर उपस्थित होते. आदर्श शिक्षक प्राप्त दोन्ही सत्कारमूर्तींना शिक्षक आ.विक्रम काळे यांनी शुभेच्छा दिल्या.

# जायन्टस ग्रुपच्या चालण्याच्या स्पर्धेत सुधीर कोर्टीकर प्रथम



आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** जायंट ग्रुप ऑफ चिकलठाणा यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी रोपळेकर हॉस्पिटल ते दर्गा चौक पर्यंतची चालण्याची स्पर्धा तीन वयोगटात घेतलेली होती. जायंटग्रुप ऑफ चिकलठाण्याच्या या स्पर्धेत ७० लोकांनी सहभाग घेतला होता.
सुप्रसिद्ध ज्येष्ठ कलावंत सुधीर कोर्टीकर यांनां ७१ ते ७५ या वयोगटात प्रथम पारितोषिकांनी गौरविण्यात आले. डॉ.जतीन शहा यांनी ज्येष्ठांना मार्गदर्शन केले. तर पोलिस निरीक्षक दिलीप चंदन यांनी विजेत्यांना भेटवस्तू व प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले. इतर वयोगटात आर.व्ही.पाटील, जगदीश माहोरकर, अशोक भालेराव, महिलांत संध्या काबरा, अरुणा काबरा, इंदिरा भट्टड, विणा ग्रोवर या विजयी झाल्याने त्यांनाही गौरविण्यात आले.
स्पर्धेचे प्रोजेक्ट चेअरमन विनोद शेवतेकर जायन्टस ग्रुपच्या सप्ताहाचे प्रमुख शिवप्रसाद तोतला , सुनील छाजेड , शितल शेवतेकर , प्रविण कटारिया , गोपाल मालपाणी , रमेश मेहता , नरेश गुप्ता , अशोक थोरात , गुरुदत्त राजपूत यांनी मोलाच्या सहकार्यातून ही स्पर्धा उत्साहात संपन्न झाली.



# दिनेश औताडेची कुस्ती स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर निवड

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील ताजनापूर येथील शांताराई कनिष्ठ महाविद्यालयाचा कुस्ती स्पर्धेत ओमराज औताडे विभागात प्रथम शालेय स्पर्धे अंतर्गत परभणी या ठिकाणी नुकत्याच झालेल्या शालेय क्रीडा स्पर्धेमधून कुस्ती या प्रकारामध्ये इयत्ता अकरावीचा विद्यार्थी ओमराज औताडे या विद्यार्थ्यांनी 70 किलो वयोगटामध्ये विभागामधून प्रथम क्रमांक घेऊन कोल्हापूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी त्याची निवड करण्यात आलेली आहे. याप्रसंगी संस्थेचे प्राचार्य श्री. गणेश काळे यांनी ओमराज दादासाहेब औताडे व वडीलांचा सत्कार केला.याप्रसंगी बाळू अवताडे अंकुश अवताडे कल्याण बुराहाडे प्रा .सुनील इनामदार , कोमल इंगळे मॅडम प्रत्यक्ष आहेर अमोल दांडेकर नलावडे मॅडम अतुल गुळवे भगवान साळुंखे किरण काळे शिक्षक कल्पना काळे उपस्थित होते. सर्वांनी सत्कार करूनपुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# जळगाव ते सोनाळा रस्त्याच्या दुतर्फा झुडपे स्वच्छ करा

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** जळगाव जामोद ते या सार्वजनिक बांधकामच्या जळगाव जामोद उपविभाग अंतर्गत येत असलेल्या रस्त्याच्या दुतर्फा सध्या पावसाळी वातावरणामुळे माजलेल्या झुडपांमुळे व बनलेल्या खड्ड्यांमुळे वाहन चालकास अडथळे दिसत नसल्याने अपघात जन्य परिस्थिती तयार होत असून कित्येक अपघात घडताना दिसत आहेत तरी लवकरात लवकर जळगाव जामोद ते सोनाळा रस्त्यावरील ही झुडपे व साईड पट्टी स्वच्छ करून वाहन चालकांना वाहन चालवताना त्यांची दृश्य क्षमता वाढवून त्यांचे प्रवास सुरक्षित करण्यात यावे असे निवेदन टुनकी येथील रहिवासी अतुल बेंदरकार यांनी २७ सप्टेंबर रोजी जळगाव जामोद येथील सहाय्यक अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग जळगाव जामोद येथे दिले असून जर या निष्क्रियपणामुळे अपघात घडल्यास संबंधित विभाग व त्याच्या अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी खळबळ जनक मागणी केली आहे. तक्रारीत म्हटल्यानुसार संबंधित विभागाने सद्यस्थितीत जळगाव जामोद ते सोनाला रस्त्यावरील रस्त्याच्या दुतर्फावरील अडथळे नियमाप्रमाणे साफ केलेले नसून यामध्ये सध्या भरपूर गवत झुडपे वाढलेले असल्याने अचानक वाहन चालकांसमोर वन्यप्राणी कुत्रे व इतर अडथळे येत आहेत. त्यामुळे कित्येक दुचाकी चालक अपघातग्रस्त होत आहेत. रस्त्यावरील खड्डे पाण्याच्या वहीवाटी हे सांभाळण्याची जबाबदारी सदर विभागाची असून ते विभाग ही सांभाळताना दिसत नाहीत. या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निष्क्रियपणामुळे जर भविष्यात कुठले अपघात किंवा जीवितहानी झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा नोंदवण्यात यावे बेंदरकार यांच्या म्हणण्यानुसार सर्व नागरिक नियमाने रोड टॅक्स भरत असताना तो रोड चांगला बनवणे व त्याला सुरक्षित ठेवणे हेच साभा विभागाचे काम असताना देखील संबंधित विभाग हे काम चोखपणे करीत नसून याच प्रमाणे मागच्या वर्षी असा अर्ज देऊनही यावर्षी तेच ते मुद्दे व तेच ते प्रॉब्लेम संबंधित विभाग समाजासमोर ठेवत असून नागरिकांना वेठीस धरत आहे.

१८१ दिवस
मुदत ठेवीवर मिळवा
11%
व्याजदर
* नियम व अटी लागू

टोल-फ्री : 18004197501 rajasthanimultistate.in

राजस्थानी मल्टीस्टेट
कार्यक्षेत्र महाराष्ट्र-कर्नाटक
राजस्थानी मल्टीस्टेट
को-ऑप. क्रेडीट सो.लि., परळी वैजनाथ
बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स

चंदुलाल बियाणी
चेअरमन

कार्यरत शाखा :
मुख्य कार्यालय व शाखा : मोंढा मार्केट, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072178/88
पंचशिल नगर शाखा : विद्यानगर जलालपूर रोड, पंचशिल नगर, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072809
मुख्य शाखा विस्तारित कक्ष : ऊर्जा प्लाझा, गणेशपार रोड, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072181
पंचशिल नगर शाखा विस्तारित कक्ष-१ : दिगंबर कॉम्प्लेक्स, नेहरू चौक (तळ), परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072180
पंचशिल नगर शाखा विस्तारित कक्ष-२ उड्डान पुला जवळ, शिवाजी नगर, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072805
सिरसाळा शाखा : बड़े निवास, जुने बस स्टँड रोड, सिरसाळा, ता. परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072184
अंबाजोगाई शाखा: प्रशांत नगर, बस स्टॅण्डच्या मागे, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072183
विस्तारीत कक्ष अंबाजोगाई-१ : मोहन कॉम्प्लेक्स, मेनरोड, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072802
विस्तारीत कक्ष अंबाजोगाई-२ घाटनांदुर, मेनरोड, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072808
बीड शाखा : जिजामाता चौक, मोंढा रोड, ता. जि. बीड. 9130072221
सोनपेठ शाखा : स्नेह सदन, विटा रोड, सोनपेठ, ता. सोनपेठ, जि. परभणी. 9130072186
गंगाखेड शाखा : डॉक्टर लेन, एच.डी.एफ.सी. बँकेसमोर, गंगाखेड, जि. परभणी. 9130072807
विभागीय कार्यालय व महेश नगर शाखा : अपना बजार २०४ २०६, आकाशवाणी जवळ, औरंगाबाद 9130072176 / 77
राजा बजार शाखा : बालाजी मंदिर समोर, राजा बजार, शहागंज, मोंढा, ता. जि. औरंगाबाद. 9130072022
माळीवाडा विस्तारीत कक्ष : नाशिक रोड, माळीवाडा, ता. जि. औरंगाबाद. 9130072803
अंबड शाखा: जालना-बीड रोड, महावीर चौक, आंबड, जि. जालना. 9130072804
जालना शाखा : मेन बस स्टँड रोड, जालना, ता. जि. जालना. 9130072806
जालना विस्तारीत कक्ष-१ : जांगडे कॉम्प्लेक्स, जालना-अंबड रोड, ता. जि. जालना. 9130072226
नांदेड विस्तारीत कक्ष : पहिला मजला, गुरूकृपा मार्केट, महावीर चौक, ता. जि. नांदेड. 9130003070
उदगीर विस्तारीत कक्ष : पहिला मजला, लासूणे कॉम्प्लेक्स, देगलूर रोड, उदगीर, जि. लातूर. 9130072190
टोकवाडी विस्तारीत कक्ष: परळी-बीड रोड, टोकवाडी, ता. परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072224
दिंद्रुड विस्तारीत कक्ष : शेप कॉम्प्लेक्स, परळी-बीड रोड, दिंद्रुड, ता. माजलगाव, जि. बीड. 9130002070
लातूर विस्तारीत कक्ष : कव्हा रोड, शिवनेरी गेट जवळ, लातूर 9130002070
औराद विस्तारीत कक्ष : मेन रोड, कृष्णा ऑईल मिल समोर, औराद शहाजनी, ता. निलंगा, जि. लातूर. 9130003044
बीड विस्तारीत कक्ष : मोंढा मार्केट, संतोषी माता मंदिर समोर, बीड, ता.जि. बीड. 9130072221
उमरगा शाखा : शिवाजी महाविद्यालय जवळ, बालाजी नगर, मेन रोड, उमरगा, जि. उस्मानाबाद.
परभणी शाखा: कापसे भवन, कच्छी बजार, सरदार वल्लभभाई पटेल रोड, परभणी.
अहमदनगर शाखा: शॉप नं. ३ व ४ बेसमेंट, मोरया कॉर्नर, मोरया मंगल कार्यालय, पाईपलाईन रोड, अहमदनगर.
केज शाखा : वकीलवाडी, कानडी रोड, केज, ता. केज. जि. बीड.
माजलगाव शाखा : गाळा क्र.८, सिद्धेश्वर कॉम्प्लेक्स, गढी कॉर्नर, गढी रोड, माजलगाव, ता. माजलगाव, जि. बीड.
नियोजित शाखा :
धर्माबाद
उमरखेड
नाशिक
पंढरपूर
रेणापूर
पुणे
अकोला
कॉर्पोरेट ऑफिस : २०५,२०६, बिल्डिंग नं. २, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड, औरंगाबाद . मो. 9130072176, 9130072177

# ध्येयवेड्या सोहमचे ना. सुधीर मुनगंटीवार यांनी केले कौतुक!

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** नव्या पिढीमध्ये काहीतरी करून दाखविण्याची जिद्द निर्माण करायची असेल, तर त्यांच्या गुणांचे कौतुक केले पाहिजे', या तत्वावर विश्वास ठेवणारे राज्याचे वने व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा पालकमंत्री ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी अलीकडेच पुन्हा एकदा त्याची प्रचिती दिली. एका व्हिडियोमुळे संपूर्ण राज्यात लोकप्रिय झालेल्या ध्येयवेड्या सोहम उईके याच्या गुणांचे कौतुक करताना त्याला खास पुस्तकांची भेटही दिली. पोंभूर्णा तालुक्यातील डोंगरहळदी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकणारा सोहम उईके याने अलीकडेच मुनगंटीवार यांची भेट घेतली. सोहम आठव्या वर्गाचा विद्यार्थी असून त्याला आयएएस व्हायचे आहे. खरेतर सगळीच मुले बालपणी काही स्वप्न बघत असतात. पण ते स्वप्न गाठण्यासाठी काय करायचे असते, याची माहिती मुलांना नसते. सोहम उईके याला अपवाद आहे. तो आठव्या वर्गात असला तरीही आयएएस होण्यासाठी काय गरजेचे आहे, याचे ज्ञान त्याला आहे. काही दिवसांपूर्वी त्याने आयएएस होण्याची जिद्द पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी यांच्याकडे बोलून दाखवली होती. त्यांनी त्याच्यासोबत झालेल्या गप्पांचा व्हिडियो सोशल मिडियावर शेअर केला आणि सोहमची जिद्द बघता बघता सर्वदूर व्हायरल झाली. ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्यापर्यंतही ही त्याची माहिती आली. दरम्यान, सोहमच ना.मुनगंटीवार यांच्या भेटीला आला. दोघांमध्ये चांगल्या गप्पा रंगल्या. या गप्पांमधून ना. श्री. मुनगंटीवार यांनी सोहमचे आवडते विषय जाणून घेतले. त्यात सोहमने इतिहास, राज्यशास्त्र व भुगोलाची आवड असल्याचे सांगीतले आणि खास करून, इतिहास हा विषय अधिक आवडतो असे सांगितले. त्यानंतर लगेच त्याच्या आवडीच्या विषयांची पुस्तके ना. श्री. मुनगंटीवार यांनी सोहमला भेट दिली. यावेळी प्रदेश महामंत्री महिला मोर्चा अल्का आत्राम, ज्योती बुरांडे माजी उपसभापती, धनराज सातपुते उपसरपंच, सोहमचे मामा उपस्थित होते. चक्क राज्याच्या वने व सांस्कृतिक मंत्री यांनी आपल्या पाठीवर कौतुकाची थाप दिली आणि एवढेच नव्हे तर आपल्या आवडीची पुस्तकेही भेट दिली हा अनुभव घेताना सोहम उईकेचा आनंद गगनात मावेनासा झाला होता. यावेळी सोहमच्या कुटुंबियांनी मुनगंटीवार यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

# विद्युत पोलवरील तारांच्या घर्षणाने आग; नागरिकांत भीतीचे वातावरण

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील मौजे लोणी ग्रामपंचायत अंतर्गत मोमीनाबाद येथे दि.२६ संध्याकाळी विद्युत तारी घर्षणामुळे मोठमोठी गोळे पडत असल्याने तेथील स्थानिक रहिवासाची मोठी तारांबळ उडाली तर महिला मुले भयभित झाल्याने ओरडत होते मात्र विजेचे गोळे थांबत नव्हते त्यामुळे वस्तीत एकच खळबळ उडाली.

सध्या पावसाळा सुरू असल्याने वारा वादळ पाऊस त्यामुळे ठिकठिकाणी झाडांना वायर खेटत असल्याने वीजेचे ये जा सुरु आहे व त्यांतून वायराला वायर चिकटून वीजेचे गोळे पडत असल्याचे चित्र आहे. ग्रामीण भागात हे प्रकार घडत असतात यात विज वितरण कंपनी कडून गावा गावात वायरमन नियुक्ती वर आहे. परंतु कर्मचारी अभाव कुणाकुणाला एक एक दोन दोन गावे देण्यात आले आहे. यात मौजे लोणी ग्रामपंचायत अंतर्गत मोमीनाबाद येथे दि.२६संध्याकाळी तारी ला तारी चिकटून विजेचे मोठमोठी गोळे पडली त्यात रहिवाशांचे घरे तारी लगतच असल्याने महिला पुरुष मुले भयभित होवून ओरडा ओरड करु लागले परंतु कुणी पावरच बंद करेना. कारण वायरमनच गायब होता.सावंगीबाजार सर्कल मधे वायरमन गायब राहण्याचे वा अपडाउन करण्याचें अनेक दिवसांपासून प्रकार सूरु आहे.मात्र याकडे वरिष्ठांचे दुर्लक्ष आहे, असे प्रकार घडून मोठी घटना अपघात झाल्यास कोण जबाबदार राहिल वीज वितरण कंपनीच्या वरिष्ठांनी ग्रामीण भागात लक्ष घालून या प्रकाराला आळा घालावा असी मागणी होत आहे. दि. २६रोजी झालेल्या प्रकारांची चौकशी करून कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



# अवैध दारूविक्री बंदी पत्राला केराची टोपली

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यात सर्वत्र ठिकठिकाणी अवैध दारू विक्री होवून शासनाच्या महसुल ला चुना लावण्याचे प्रकार घडत असुण याकडे मात्र याकडे प्रशासनाचे सोयीस्कर दुर्लक्षअसल्याने व नाहक्क महिला मुले मुली भाविकांना त्रास होत असल्याने आमदार प्रशांत बंब व झरीचे सरपंच करण सिंग यांनी पोलिस प्रशासनाला पत्र दिले. परंतु त्यांवर कारवाई न होता त्याला केराची टोपली दाखविण्यात आली असल्याचे चित्र आहे.तालुक्यातील झरी -पाडळी ता.खुलताबाद



.फाट्यावर सर्रास उघडपणे अवैध दारू विक्री सुरु असल्याने पाडळी येथे नृसिंह मंदिर देवदर्शन साठी जाणारे येणारे भाविक व फाट्यावर येजा साठी वाहनांची प्रतिक्षा करत उभे असलेले महिला मुले मुली भाविक यांना अवैध दारू विक्री तथा तळीरामाकडून अश्लील शिवेगाळ फडतुसपणा इशारे याचा त्रास होत असल्याने झरीचे सरपंच करण सिंग राजपूत यांनी पोलिस निरीक्षक खुलताबाद यांना पत्र देवून हा प्रकार थांबवावा अशी मागणी केली.तर तद्नंतर गंगापुर खुलताबाद चे विद्यामान आमदार प्रशांतभाऊ बंब यांनी ही पोलिस प्रशासनाला पत्र देवून हा प्रकार थांबवावा अशी मागणी केली होती.आजगयात या अवैध बोगस दारु विक्री व्यवसाय थांबला नाही. तर तालुक्यात ठिकठिकाणी उघडपणे धाबे हॉटेल रस्त्यांवर परमिट नसताना सहज दारु उपलब्ध होत आहे. यात शासनाचे महसुलला चुना लागत आहे. मात्र प्रशासन दारु शुल्क विभाग,क्राईम विभाग यांकडे सोयीस्कर दुर्लक्ष करून असुण या अवैध बोगस दारुतून लाखो रुपयांची उलाढाल होत आहे.तर नागरिकांना त्रास सहन करावे लागत आहे याची दखल आमदार प्रशांत भाऊ बंब व झरीचे सरपंच करण सिंग राजपूत यांनी घेतली खरी परंतु त्यांच्या पत्रालाच केराची टोपली दाखविण्यात आली आहे.

# घुघुस येथे 'निसर्ग आणि माझे आरोग्य' विषयावर कार्यशाळा

आधुनिक केसरी न्यूज

**घुघुस :** स्थानिक चिंतामणी शिक्षण प्रसारक मंडळ बल्लारपूर द्वारा संचालित चिंतामणी महाविद्यालय, घुघुस जि. चंद्रपूर येथे दिनांक 26 सप्टेंबर 2023 रोज मंगळवारला सकाळी 10.30 वाजता इको - प्रो संघटना, चंद्रपूर "निसर्ग आणि माझे आरोग्य" या एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या एकदिवसीय कार्यशाळेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. रवि धारपवार हे होते, तर प्रमुख वक्ते ( अध्यक्ष, इको प्रो संघटना, चंद्रपूर ) येथील सुप्रसिद्ध वक्ते श्री बंडूजी धोतरे हे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे श्री सुनील बेलाल (सामाजिक कार्यकर्ता, चंद्रपूर ) हे होते. येथे तर कार्यक्रमाचे आयोजक प्रा. महेंद्र कुंभारे हे उपस्थित होते.

श्री बंडूजी धोतरे यांनी आपल्या तेजस्वी वाणीतून " निसर्ग आणि माझे आरोग्य" या विषयावर अतिशय उत्तमपणे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रत्येक व्यक्तीने आपल्या आरोग्याकडे लक्ष देणे




अतिशय आवश्यक आहे. आजच्या आधुनिक युगात व्यक्तीची बदलती जीवनशैली हे अतिशय परिणामकारक असल्याचे असून त्यामुळे विविध आजाराला व्यक्ती हा बळी पडतो आणि त्याचे वाईट परिणाम आपल्या आरोग्यावर असतात. मानवाने पाश्चीमात्य देशाची जीवनशैली स्वीकारून आपण भारताची मूळ संस्कृती विसरलो आहे. त्यामुळे मानवाचे आरोग्यावर होणाऱ्या गंभीर आजारांना सामोरे जात आहोत. विविध आजाराचा मानवी जीवनावर त्याचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कसं लाभ आणि हानी होऊ शकतो यावर श्री बंडूजी धोत्रे यांनी प्रात्यक्षिक करून दाखवले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष कार्यकारी प्राचार्य डॉ. रवि धारपवार यांनी "निसर्ग आणि माझे आरोग्य" या कार्यशाळेस अतिशय सुंदर आणि महत्त्वाचे मार्गदर्शन करून उपस्थित विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाची प्रास्ताविक प्रा. महेंद्र कुंभारे यांनी करून एक दिवसीय कार्यशाळेची पार्श्वभूमी विद्यार्थ्यांना समजून सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गणेश सुरजूसे यांनी केले. तर आभार प्रा. मंगेश जमदाडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता महाविद्यालयातील प्राध्यापक वृद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी अथक प्रयत्न करून कार्यक्रमास सहकार्य केले.

# लोणंद येथे २७ ऑक्टोबर रोजी धम्म परिषद, दीक्षा समारंभाचे आयोजन

## डॉ. बाबासाहेबांचे नातू डॉ.भीमराव यशवंत आंबेडकर राहणार उपस्थित

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** ता.खंडाळा येथे शुक्रवार दि.२७ ऑक्टोबर २०२३ रोजी दुपारी १ वाजता धम्म परिषद व दिक्षा समारंभाचे आयोजन करण्यात आलेले असून या कार्यक्रमास विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू व भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. भीमराव यशवंत आंबेडकर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.पूज्य भन्ते धम्मानंद बोधी (बुद्धगया) यांच्या मार्गदर्शनाखाली ही धम्म परिषद व दिक्षा समारंभ कार्यक्रम संपन्न होणार असून भारतीय बौद्ध महासभेचे सातारा जिल्हा पूर्व अध्यक्ष श्रीमंत घोरपडे हे धम्म परिषदेचे अध्यक्ष असणार आहेत. प्रमुख उपस्थिती म्हणून लोणंद नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सीमा खरात असणार आहेत. तसेच एस.के.भंडारे, एस.एस. वानखेडे, भिकाजी कांबळे, बी.एच.गायकवाड, विशाखा थोरात, इंद्रजीत थोरात, संजय भिसे, रंजना भोसले, मिलींद भिसे, सुरेश चव्हाण, प्रा.डॉ.कल्पना चव्हाण आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. धम्म परिषदेचे स्वागताध्यक्ष यशवंत खुंटे हे असून सूत्रसंचालन सज्जन खरात, शरद कदम, अॅड. हेमंत खरात, अविनाश बारसिंग हे करणार आहेत. धम्म परिषद व दिक्षा समारंभ कार्यक्रमाच्या आधी दिनांक १८ ते २६ सप्टेंबर या कालावधीत महिला शिबिर, समता सैनिक दल आणि श्रामणेर शिबिर यांचे देखील आयोजन करण्यात आलेले आहे. खंडाळा तालुका श्रामणेर प्रशिक्षण शिबीराचे मार्गदर्शक म्हणून पूज्यभंते धम्मानंद बोधी हे असणार आहेत. बुधवार दि.१८ ऑक्टोबर ते शुक्रवार २० ऑक्टोबर रोजी महिला उपासिका शिबीर, शनिवार दि. २१ ऑक्टोबर ते रविवार दि. २२ ऑक्टोबर रोजी समता सैनिक दल शिबीर, रविवार दि. २२ ऑक्टोबर ते गुरुवार दि. २६ ऑक्टोबरपर्यंत निवासी श्रामणेर शिबीर संपन्न करण्यात येणार आहे. संपूर्ण शिबिरासाठी केंद्रिय शिक्षक म्हणून श्रीमंत घोरपडे, अरुण गायकवाड, नानासो माहिते, यशवंत खुंटे, दादासो भोसले, अविनाश बारसिंग, पिराजी सातपुते, सुजाता गायकवाड,कुसुम घोरपडे,डॉ.मिना इंजे, संगिता ढावरे,अनुराधा सोनवणे यांचे मार्गदर्शन असणार आहे.तदनंतर शुक्रवार दि.२७ ऑक्टोबर रोजी भव्य दिक्षा समारंभ व समारोप समारंभ कार्यक्रम घेण्यात येणार आहे.यावेळी पंचशील बुद्धविहार येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास डॉ.भीमराव यशवंतराव आंबेडकर यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन व समता सैनिक दलाच्या वतीने मानवंदना देण्यात येईल. धम्म परिषदेच्या ठिकाणी श्रमणेर शिबीर व महिला शिबीराचा सांगता समारंभ व प्रमाणपत्र वाटप केले जाईल.धम्मपरिषदेच्या वेळी धम्मदिक्षेचा कार्यक्रम घेण्यात येईल.पूज्यभंते धम्मानंद बोधी यांच्याकडून दिक्षा देण्यात येईल.

# ऊस उत्पादकास मिळणार 3 लाख बिगर बोजा कर्ज

## भावना बोर्डीकरांचा श्रीतुळजाभवानी राज्यातील ठरला पहिला शुगर कारखाना

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** सेलू तालुक्यातील आडगाव (दराडे) येथे आज श्रीतुळजाभवानी साखर कारखाण्याची ऊस उत्पादक शेतकरी व एसबीआय बँक अधिकारी आदींची व्यापक मेळावा बैठक संपन्न झाली. सदरीरल बैठकीत मंचावर श्री तुळजाभवानी शुगर कारखान्याच्या संचालिका भावनाताई बोर्डीकर एसबीआय बँकेचे रिजनल मॅनेजर सम्राट,आनंद पाटील शेतकी अधिकारी वाव्हळ कारखाना टेक्निकल डायरेटर सुधीर साळवे,भाजप तालुका अध्यक्ष ॲड.विनोद राठोड,या सह जिंतूर-सेलू भागातील ऊस उत्पादक शेतकरी व महिला बचत गटांच्या महिलांची उपस्थिती मोठ्या प्रमानावर होती.

सदरील बैठकीत प्रास्ताविक भाषणात कारखानाच्या संचालिका भावना बोर्डीकर यांनी महत्वाची घोषणा केली की ऊस उत्पादकांना एसबीआय बँक शेतकऱ्यांच्या सातबारावर कोणताही बोजा न टाकता तीन लाखापर्यंत ऊस उत्पादकांना कर्ज एसबीआय बँक देणार असे सांगितले. व त्याबद्दल बँकेचा व आपल्या श्रीतुळजाभवाणी कारखान्याचा करार सुद्धा झालेला आहे हेही नमूद केले.या वर्षी पहिला हफ्ता 2300 रु देणार असे सांगून एकरी 52000 रु बँक शेतकऱ्यांना देणार असून आपला कारखाना शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगती साठी भविष्यात वेळोवेळी पुढाकार घेईल असेही भावना बोर्डीरकांनी स्पष्ट केले. या वेळी उपस्थित एसबीआय रिजनल मॅनेजर सम्राट यांनी श्रीतुळभवानी साखर कारखान्याशी करार झाला असून या वर्षी पासून 3 लाखा पर्यत बँक 7/12 वर कोणताही बोजा न टाकता कर्ज देणार असे सांगितले. सदरील कर्ज हे केवळ 7 टक्के दराने देणार असून नियमित कर्ज फेड झाली तर 3 टक्के केंद्र सरकार व राज्यसरकार 3 टक्के परतावा देणार असेही स्पष्ट केले.दत्तक बँक नसली तर एसबीआय बँक संबंधित गावाना कर्ज देणार अशीही महत्वाची घोषणा सम्राट यांनी केली.या शिवाय ट्रॅकट,पाइपलाइन आदी शेती संबंधित साधन सामुग्रीना बँक उसउत्पादकांना वेळोवेळी आर्थिक मदत करेल असेही सांगितले. यावेळी बँक शेतकरी अधिकारी आनंद पाटील सह अमोल सर यांनीही कर्ज प्रकरणी उपस्थित शेतकऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.उसउत्पादक शेतकरी मवळाव्याचे आयोजक शेतकी अधिकारी वाव्हळ यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. एकुणच प्रथमच कोणताही सातबारावर बोजा न टाकता एसबीआय बँक 3 लाखा पर्यत उसउत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत करत असल्याबद्दल भविष्यात शेतकरी बांधव जास्त प्रमाणात ऊस लागवडीसाठी पुढाकार घेतील असे चित्र स्पष्ट होते.





# जबरी चोरी करणारे पोलिसांच्या ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** दि.२१ सप्टेंबर रोजी दहा रुपये किमतीची होन्डा कपनीची ॲक्टीव्हा मोटार सायकल तसेच दोन हजार रुपये किमतीचा मोबाईल तसेच पाचशे रुपये रोख रक्कम असे लिफ्ट मागण्याच्या बहाण्याने जबरदस्तीने मारहाण करुन हिसकावून पळुन गेले बाबतच्या तक्रारी वरुन वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

त्या अनुषंगाने शहर पोलिसांनी सापळा असून आरोपींना मुद्देमाल सहित ताब्यात घेण्यात आले आहे. मिळालेल्या गुप्त बातमीच्या आधारे नवापुर व सुरत येथे रवाना झालो असतांना गुप्तबातमीदार मार्फत बातमी मिळाली की, ललीत चौधरी व रमेश सोन्नर हे पांढ-या रंगाची ॲक्टिव्हा सह नवापुर येथून त्यांचे राहते घरी धुळे शहरात येत असल्याची खात्रीशिर माहिती मिळाल्याने पोलीस स्टॉफ कुसुंबा येथून धुळे येथे परत येवुन सदर आरोपीतांचे राहते घराजवळ सापळा लावून एक पांढ-या रंगाची ॲक्टिव्हा व सदर वाहनावरील दोन इसम हे मिळालेल्या गुप्त बातमीतील वर्णनाप्रमाणे मिळुन आल्याने वाहन चालविणा-या इसमास त्याचे नाव विचारता त्याने आपले नाव ललीत बापु चौधरी वय २२ वर्षे, रा. साईदर्शन कॉलनी जवळ, श्रीरामनगर मिल परिसर, धुळे व त्याचे पाठीमागे बसलेल्या इसमाने आपले नाव रमेश राजु सोन्नर वय १९ वर्षे, रा. पिंजारी चाळ मिल परिसर धुळे असे असल्याचे सांगितले त्याचे कडील वाहनाची कागद पत्र व इतर चौकशी करीता ते उडवाउडवीचे उत्तरे देत असल्याने सोबतच्या पोलीस अंमलदार यांचे मदतीने सदर वाहन हयाची त्यावर असलेल्या नंबर वरुन मोबाईल मधिल ॲपवर कोणतीही माहिती उपलब्ध होत नसल्याने त्यांना ताब्यात घेवुन पोलीस स्टेशनला आले वर त्यांचे कडेस अधिक चौकशी केल्यावर नमुद दोन्ही इसम अश्यांनी भैय्या पिंजारी याचे सांगणे वरुन फिर्यादीची लुटमार करण्याच्या हेतुने मारहाण करुन त्यांची ॲक्टिव्हा मोटार सायकल व मोबाईल व पैसे हिसकावून घेतल्या नंतर भैय्या पिंजारी हा मोबाईल घेवून सुरत येथे निघुन गेला व सदर ॲक्टिव्हाचे नंबर व नाव बदली केल्याचे निष्पन्न झाले आहे. तरी सदर आरोपी यांना दिनांक २६ सप्टेंबर रोजी ताब्यात घेतले आहे.

सदर गुन्हयाचे तपासात पोलीस अधिक्षक संजय बारकुंड सो, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री किशोर काळे, उपविभागिय पोलीस अधिकारी श्री. सचिन हिरे यांचे मार्गदर्शनखाली सो धुळे शहर पोलीस स्टेशन पोलीस निरिक्षक आनंद कोकरे यांनी तपास अधिकारी पोसई उजे यांचे सह विजय शिरसाठ, दिनेश परदेशी, कुंदन पटाईत, रविंद्र गिरासे,मनिष सोनगिरे, महेश मोरे, प्रविण पाटील, केतन पाटील, अमोल पगारे, वसंत कोकणी,शाकिर शेख, तुषार पारधी, योगेश ठाकुर, अमित रनमाळे यांनी यातील आरोपी यांचा कसोशिने शोध घेवून ताब्यात घेवुन सदर कारवाही करण्यात आली

# गायकवाड कुटुंबीयांना पश्चिम बंगालचा प्रतिष्ठेचा पुरस्कार कलकत्ता येथे प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्य कामगार विमा योजना योजनेचे स्टेट नोडल अधिकारी डॉ.संजय माधवराव गायकवाड (मुखेडकर) यांच्या पत्नी व दोन मुलांना पश्चिम बंगालमधील प्रतिष्ठेचे नेताजी सुभाषचंद्र बोस ग्लोबल आयकॉन लीडर राष्ट्रीय पुरस्कार, बंग गौरव राष्ट्रीय पुरस्कार रविवारी( दि. 24 ) कलकत्ता येथे विशेष कार्यक्रमात प्रदान करण्यात आले. या पुरस्काराबद्दल डॉ.संजय गायकवाड कुटुंबीयांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. राज्य कामगार विमा योजना योजनेचे स्टेट नोडल अधिकारी डॉ.संजय माधवराव गायकवाड (मुखेडकर) यांनी कोरोना काळात भारतातील सर्व लोकांना ONE MAN ARMY सारखी मदत केली. त्याचा फायदा पश्चिम बंगालमधील लोकांना सुध्दा झाला होता याची दखल घेत डॉ.संजय गायकवाड यांना पश्चिम बंगालचा प्रतिष्ठेचा समजला जाणारा नेताजी सुभाषचंद्र बोस ग्लोबल आयकॉन लीडर राष्ट्रीय पुरस्कार 2023, त्यांच्या पत्नी सौ. कल्पना संजय गायकवाड यांचा अवयवदानावर आधारित चित्रपट 'तुझ्यासाठी काहीही ', ऑस्कर पुरस्कारासाठी पात्र ठरला त्याबद्दल त्यांना 'बंग गौरव राष्ट्रीय पुरस्कार 2023', त्यांचे मोठे चिरंजीव संकल्प याने बनवलेला रोबोट भारतातील सर्व आयआयटी मधून प्रथम आल्याबद्दल त्यास ',नेताजी सुभाषचंद्र बोस ग्लोबल आयकॉन लिडर राष्ट्रीय पुरस्कार 2023', छोटे चिरंजीव कर्मण्य याने भारतातील मासटरमाईंड परीक्षेत प्रथम क्रमांक, महाराष्ट्र टॅलेंट परीक्षेत उत्तीर्ण यासह 52 परीक्षा उत्तीर्ण केल्याबद्दल 'बंग गौरव पुरस्कार 2023' देऊन गायकवाड कुटुंबियांना गौरविण्यात आले. याप्रसंगी नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे भाचे चंद्रकुमार बोस, पं. रविशंकर यांचे जावई नबारुन चॅटर्जी, बनारस घराण्याचे तबलावादक पं. प्रदीप घोष, डॉ. बिर बंशी, डॉ. राजीव पाल, परबिररॉय यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.




गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर